# प्रकरण पांचवे

## द.ता.भोसले यांच्या "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने त्यांच्या कथेतील प्रादेशिकतेचा अभ्यास

## प्रकरण पांचवे

## द.ता.भोसले यांच्या "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने त्यांच्या कथेतील प्रादेशिकतेचा अभ्यास

### 1. "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या प्रादेशिक कथासंग्रहांतील कथांचे आशय-विषय दृष्टया विभाजन व कथा सार चर्चा :-

**अगं अगं म्हशी :-**

हा त्यांचा 1982 मध्ये प्रसिध्द झालेला कथासंग्रह. यामध्ये एकूण 15 कथांचा समावेश आहे. हा अस्सल ग्रामीण विनोदी कथासंग्रह म्हणून विशेष उल्लेखनीय वाटतो. ग्रामीण प्रदेशातील लोकांच्या जीवनातील साधे-साधे प्रसंगही त्यांनी विनोदाच्या साहयाने बोलके केले आहेत. यातील विनोदी कथांचा बाज ग्रामीण विनोदी ढंगाचा असून त्याला प्रादेशिकतेचे अंग आहे. त्यातून प्रादेशिक संस्कृती, निसर्ग, रितीरिवाज, परंपरा, सामाजिक संकेत याबरोबरच तेथील प्रादेशिक जीवनमानाचे व समस्यांचे दर्शन घडते. व्यापक आणि आत्मीक पातळीवरचा सुधारणावाद हेच त्यांच्या विनोदी कथांचे उद्दिष्ट दिसते. म्हणूनच वरवरच्या हास्यास्पदतेला अर्थपूर्ण गंभीरता देण्यास ते विसरत नाहीत. म्हणूनच मानवी जीवनातील अर्थपूर्ण जीवन-जाणीवांचा यथार्थ शोध हे त्यांच्या कथांचे वैशिष्टय ठरते. मानवाचे गुदमरलेले श्वास विकृत असतील तर ते हास्यास्पद ठरतात आणि स्वाभाविक असतील तर ते गंभीर ठरतात याचा प्रत्यय त्यांच्या कथांतून येतो. मानवाच्या पोरकट जीवन जाणीवांवर, विकृत अशा मर्मावर आणि एकूणच मानवी जीवनातील विसंगतीवर त्यांची लेखणी ताशेरे ओढते. ख-या जीवन-जाणीवांकडे डोळेझाक करून उप-या जीवन जाणीवांना कवटाळल्यामुळे जीवन कसे हास्यापद ठरते, याचे समर्पक आणि विनोदपूर्ण दर्शन त्यांच्या या कथांतून घडते. म्हणूनच त्यांचा विनोद हा श्रेष्ठ, प्रौढ आणि परिपक्व वाटतो.

त्यांच्या या कथासंग्रहाने "प्रादेशिक जीवनाचे" वेगळे क्षितीज शोधण्याचा प्रयत्न केला आहे. आणि प्रादेशिक जीवनातील विनोदाचा आनंददायी आविष्कार घडवण्यात त्यांना यश आले आहे.

आजकाल अभिजात मिस्कीलतेचा प्रसन्न आविष्कार ग्रामीण कथेत दुर्मिळ झाला आहे. तोच दुर्मिळ आविष्कार भोसल्यांच्या कथेत पहावयास मिळतो. उथळपणापासून दूर राहून जीवनाचा विनोदाच्या सहाय्याने शोध घेण्याची अर्थपूर्ण धडपड भोसल्यांच्या कथा करताना दिसतात. म्हणूनच त्यांच्या विनोदी कथा वाचकाला अमोघ आनंद देऊन जातात. त्यांच्या कथावाङ्मयाला लाभलेले प्रादेशिकतेचे अंग, त्यांच्या कथांना स्वाभाविक जीवनदर्शन घडवण्याचे सामर्थ्य मिळवून देते

विशेषत्वाने त्यांच्या कथासाहित्यातून ग्रामीण प्रदेशातील शेतकी जीवनाच्या सुख-दुःखाचे चित्रण, ग्रामीण भागातील स्त्रियांच्या सुख-दुःखाचे चित्रण, ग्रामीण जीवनावर होणारा राजकारणाचा नि नवविचारांचा इष्ट अनिष्ट परिणाम, दलितांच्या आणि झोपडवाशीयांच्या उपेक्षीत जीवनाचे चित्रण आणि येनकेन प्रकारे प्रादेशिक जीवनाशी बांधल्या गेलेल्या इतर लोकांचे जीवनदर्शन इत्यादींचा प्रादुर्भाव आधिक्याने जाणवतो. येणेप्रमाणे त्यांच्या कथा विषयात आणि आशयात विविधता असल्याचे दिसून येते. अभिव्यक्तीच्या दृष्टीने त्यांच्या कथांचा साचा एकसारखाच आहे. त्यामुळे विशिष्ट जीवनदर्शनाच्या अनुषंगाने त्यांच्या कथांचे वर्गीकरण करणे मला गरजेचे वाटते. अभ्यासदृष्टया हे वर्गीकरण अत्यंत उपयुक्त ठरेल. म्हणूनच हे वर्गीकरण मी पुढीलप्रमाणे करू इच्छितो - 1. शेतकी प्रदेश जीवनाभोवती फिरणा-या कथा, 2. स्त्रियांच्या जीवनाभोवती फिरणा-या कथा, 3. राजकीय जीवनाभोवती आणि दलित जीवनाभोवती फिरणा-या कथा, व 4. झोपडवाशीय जीवनाभोवती फिरणा-या कथा आणि इतर कथा असे हे वर्गीकरण करता येते. आणि या सा-यांचा तपशीलवार आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल -

## 1· शेतकी प्रदेश जीवनाभोवती फिरणा-या कथा :-

खरे तर भोसल्यांच्या बहुतांश कथा या ग्रामीण प्रदेश जीवनातील शेतकी जीवनाभोवती फिरणा-या आहेत· या कथांतील पात्रे शेजी जीवनाशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे संबंधीत आहेत· मग ते बलूतेदार असो, दलित असो की झोपडवाशीय असो· हे सर्व लोक शेतीजीवनाच्या आश्रयानं जगणारे आहेत· स्वतःच्या मालकीची शेतजमीन असणारे लोक त्यांच्या कथांतून थोडेच भेटतात· मात्र शेतमजूरी करणारे आणि शेतीव्यवसायाशी संबंधीत लोकांच्या आश्रयानं पोट भरणारे लोक त्यांच्या कथेत अधिक्याने येतात· तेथील शेतीव्यवसाय हा अल्पसंख्यांकांचा प्रमुख व्यवसाय असून बहुसंख्य लोक हे पोट भरण्याचं दुय्यम साधन म्हणून शेतीव्यवसायाकडं वळलेले दिसतात· ज्यांना शेतमजूरी शिवाय दुसरा पर्यायच नाही अशीही काही पात्रे त्यांच्या कथांतून भेटतात· तरीही त्यांच्या जीवनदर्शनामागील प्रमुख हेतु लक्षात घेऊन त्यांना या विभागातून (शेतकी जीवनदर्शनाच्या) वगळण्यात आले आहे· किंबहुना ज्या कथांचा मुख्य हेतु हा शेतकी जीवनदर्शन आणि शेतक-यांच्या जीवनजाणीवा एवढाच आहे, अशाच कथांचा समावेश सदर सदरात केला आहे· या शेतकी जीवनाभोवती फिरणा-या कथांचा मागोवा खालीलप्रमाणे घेता येईल -

### अगं अगं म्हशी :-

या कथेतला गेना हा शेतकरी दिवसभर शेतात राबून संध्याकाळी घरी येतो· तो भूकेने व्याकुळ आणि हैराण झालेला असतो· घरी पोहचताच भरपेट जेवण करायचे असा त्याचा बेत असतो· पण घरी पोहचल्यावर त्याचा साराच विरस होतो· बायको नुकतंच दळण निवडत बसलेली असते·ते दळून मिळणं, त्याच्या भाकरी होणं आणि त्यानंतर जेवणं ही बाब त्याला कितीतरी असह्य वाटते· म्हणूनच तो रागाने चवताळतो - "दिसभर काय कोर्टात गेल्ती काय?" असं बायकोला हिणवतो· पण बायकोही बेरकी· त्याच्या खादाडपणाबद्दल ती त्याचा पाणउतारा करते· दोघांनाही एकमेकांचा खूप राग येतो· ती दोघेही परस्परांवर रूसतात· या रागापायीच गेना न जेवताच उपाशी झोपतो· पण भुकेच्या डोंबात म्हैशीची पेंड खाण्याची त्याच्यावर कशी वेळ येते, आणि या भुकेमुळेच त्याचा लटका अभिमान कसा लुळा पडतो,

याचं विनोदपूर्ण दर्शन या कथेतून घडतं· कष्टमय शेतीजीवनाच्या व्यापातून ग्रामीण पती-पत्नी ही परस्परांतील रागलोभाची केंद्र ठरतात· त्यामुळंच शेतकी जीवनातील कष्टमयता या रागालोभातून शिथील होताना दिसते·

## प्रौढशिक्षण :-

या कथेतील शेतीजीवनावर उदरनिर्वाह भागवणा-या लोकांना प्रौढशिक्षणाचं महत्त्व कळत नाही· शेती जीवन हेच त्यांचे जणू सारसर्वस्व आहे· त्यामुळं ते या "प्रौढशिक्षण प्रवर्गाकडं" गांभीर्यानं पहात नाहीत· आणि त्यानी गांभीर्यानं पाहूनही काही उपयोग होईल असे ते प्रशिक्षणार्थी नसतात· तसेच या प्रौढशिक्षकालाही फार मोठी तळमळ असते असं नाही· तर एकूणच प्रौढशिक्षणार्थी आणि प्रौढशिक्षक हे दोन्हीही घटक तसे तकलादूच असतात· अर्थात हे दोन्ही घटक या प्रक्षिणाकडं एकांगी हेतूनं पाहतात· म्हणजेच प्रौढशिक्षकाचा या प्रशिक्षणाकडं पाहण्याचा मुख्य उद्देश्य हा प्रमाणपत्र मिळवण्याचा आहे! तर प्रौढशिक्षणार्थीचा उद्देश हा केवळ टाईमपास, प्रणयसुख आणि वासनापूर्ती एवढाच आहे! म्हणूनच सरकार ज्या हेतूनं हा उपक्रम राबवत आहे तो हेतू कसा संधिकोप-याला पडतो आणि रानदांडग्या खेडूतांच्या हेतूपुरस्सर दृष्टीकोनामुळे, त्या प्रशिक्षण प्रवर्गाचे कसे धिंडवडे निघतात आणि तो प्रौढशिक्षण वर्ग एक दिवस "व्याभिचाराचेच केंद्र" कसे ठरतो, याचे हास्यास्पद तितकेच केविलवाणे दर्शन या कथेतून घडते·

## बेटा से बाप सवाई :-

या कथेतला तुका पवार हा शेतकी जीवनातील साध्या राहणीमानाचा पाईक आहे· प्रदेश संस्कृतीनुसार वाटयाला आलेल्या या साध्या राहणीमानाचं, आपल्या पोराकडून झालेलं विडंबन त्याला आणि गावक-यानाही खपत नाही· म्हणून मुंबईला जाऊन विदुषकी फॅशननं झपाटलेल्या आपल्या पोराला तो कसा धडा शिकवतो याचं आगळंवेगळं तितकंच विनोदपूर्ण चित्रण या कथेत आलं आहे· यातूनच आपल्या साध्या राहणीमानाचा आणि प्रदेशपुरस्सर पोशाखाचा या शेतकी जीवनावर प्रभाव पडलेला दिसतो·

**कथा ही अंत्यसंस्काराची :-**

शेतक-याचं जीवन हे थोडं कष्टप्रदच. त्यातूनही त्याची हालअपेष्टा वाढलीच तर त्याच्या कृती-उक्तीतूनही त्याचा स्वाभाविक वैताग नि बेदरकारपणा व्यक्त होत असतो. यातूनच तो भावूक तितकाच बेदरकारही होताना दिसतो. दिवसभरातील पावसाच्या रिपरिपीनं आणि शेतातील राबणूकीनं वैतागलेला रामा घरी येऊन नुकतीच विश्रांती घेत असतो. त्यातच त्याला सपाटून भूक लागलेली असते. पण स्वयंपाक सुरु असतो. इतक्यात त्याच्या भावकीतली म्हातारी मेल्याचा त्याला निरोप मिळतो. तिच्या अंत्यसंस्कारासाठी त्याला तातडीनं पण उपासपोटीच जावं लागतं. उपासपोटी रात्रीच्या वेळी त्या भयानक पावसाळी पार्श्वभूमीवर, ही अंत्यसंस्काराची झालेली परवड अंगावर काटा उभा करते. या परवडीनं सारे लोक आणि रामाही खूपच वैतागतो. इतका की, जेव्हा ते अंत्यसंस्कारावरुन परत येतात तेव्हा त्यांना पवाराच्या म्हातारीला ज्यास्त झाल्याचं समजतं, तेव्हा रामा सहजपणे बोलून जातो की, "तसं काय आसंल तर, तिला म्हणावं दिवसा मरायचं आसंल तर मर." यातून त्याच्या स्वाभाविक वैतागातील भीषणताच प्रकट झाली आहे.

**सुटका :-**

शेतकरी कुटुंबात पोरवडा वाढल्यानं दारिद्रय वाढतं. आणि मायाळू माणसंही मायावी (मखरी) बनतात. याचं दर्शन घडवणारी ही कथा आहे. सुगीचे दिवस असतात. म्हणून नागा कराळे आपल्या म्हाता-या आईच्या जीवावर पोरवडा टाकून, बायकोसह रानात गेलेला असतो. त्यातलंच एक पोर रांजणात अडकून बसतं. लोक गोळा होतात. पण पोराची सुटका करण्यात त्यांना अपयश येतं. किंबहूना म्हातारीची अट्ट असते की, "रांजण फोडायचा नाही." परंतु रांजण फोडल्याशिवाय त्याची सुटका करता येणार नसते. म्हणून इतर लोकही गांभीर्यानं घेत नाहीत. यापेक्षाही म्हातारीचा संवाद विलक्षण बोलका ठरतो. ती म्हणते "पोरगं काय वर्साला एक हाय, पण रांजण फुटला तर मिळायचा न्हाय." या कटूसत्यावर प्रकाश पडतो. शेवटी मायाळू आईबापांच्या औपचारिक प्रयत्नातून रांजण फुटतोच, हा भाग वेगळा. तरीही पोरांचा पोरवडा वाढल्याने घरातील क्षुल्लक

किंमतीच्या वस्तूंपेक्षा, त्या पोराची किंमत कशी कमी ठरते· याचं हास्यास्पद तितकंच हृदयद्रावक चित्र या कथेत दिसून येते·

तात्पर्य - भोसल्यांच्या कथेतल्या शेतकी जीवन जगणा-या या पात्रांच्या जीवनावर, सांगोला परिसरातील प्रादेशिक जीवनाचा प्रभाव पडल्याचे दिसते· तरीही गेनासारखी किरकोळ कारणावरून बायकोवर रुसणारी शेतकरी पात्रे, "प्रौढशिक्षण" मध्ये भेटणारी वासनेनं वखवखलेली रानदांडगी अन् छद्मी पात्रे, तुका पवारासारखी परंपराप्रिय, साधी-भाबडी तरीपण सवाई पात्रे, "कथा अंत्यसंस्काराची" मधील रामासारखी भावूक तरीपण बेदरकार पात्रे, आणि "सुटका" मधील नागा कराळ्याच्या कुटुंबातील पात्रांसारखी मायाळू तरीपण मायावी, मखरी अन् औपचारिक पात्रे, ही सारी शेतकरी पात्रे केवळ सांगोला परिसरांतच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रभर सापडतात· आणि इथंच त्यांच्या प्रादेशिकतेला व्यापक आणि वैश्विक परिमाण लाभलेलं दिसतं·

2· स्त्रीयांच्या जीवनाभोवती फिरणा-या कथा :-

ग्रामीण परिसरातील सामान्य स्त्रीयांच्या दुःखाचं स्वरूप काय आहे? याचा धक्कादायक नि यथार्थ शोध भोसल्यांनी आपल्या कथांतून घेतला आहे·

दुःख :-

या कथेतला इसनू· चार सहा दिवस अंथरूणाला पडून असतो· तो मरतो· आळसी बायको· घरचं अठरा विश्वे दारिद्रय· इसनू बायकोची उठाठेव करण्यापासून ते कुणाचंही पडेल ते काम करणारा असा अगदीच भाबडा· त्याच्या मरणानं त्याच्या कामचुकार बायकोला जे दुःख होतं, त्या दुःखाचं लेखकानं विडंबन केलं आहे· इतकंच काय पण तिच्याभोवती जमलेल्या आजूबाजूच्या बायकांनाही इसनूच्या मरणाचं व्यवहारी दुःख आहे· कारण इसनू हा त्यांचोही पडेल ती कामं करायचा· पण आता ती कामं कोण करणार? याचंच सा-याजनींना सुतक आलेलं असतं। तसेच पाटलीन बाई अन् देशमुखीन काकू यांच्याकडून इसनूनं हातउचल घेतलेली असते, ती आता बुडते की काय? याचंच त्यांना वाईट वाटतं· मात्र इसनूच्या आईच्या दुःखाच स्वरूप वेगळं असतं· ती आपलं दुःख व्यक्त करत नाही· कारण तिचं

दुःख हे खरं दुःख आहे. इसनूकडून मिळणा-या व्यवहारी सुखापेक्षा, त्याचं अस्तीत्व नाहीसं झालं याचंच तिला दुःख आहे. इसनूच्या आईखेरीज कुणाचंही दुःख शाश्वत नाही. म्हणून तिच्याखेरीच इतर स्त्रियांच्या लटक्या दुःखाचं स्वरूप लेखकानं मोठया हास्यास्पद शैलीत चित्रित केले आहे. अनेक स्त्रियांच्या दुःखाचे व्यक्तिपरत्वे स्वरूप काय आहे? हे मोठया गमतीदारपणे व्यक्त झाले आहे. "जन हे सुखाचे-दिल्या घेतल्याचे"[1] याचा प्रत्यय या कथेतून येतो. कथासूत्र ध्यानात घेता, या कथेचा तेथल्या प्रादेशिकतेशी नेमका संबंध काय आहे? हे सुध्दा सांगता येते. दुष्काळी मातीत जगणा-या दारिद्रयपीडीत अन् व्यवहारी माणसांच्या जरामरणाच्या कल्पना भिन्न आहेत. जगण्यातलं शाश्वत दुःख त्यांच्या नसांनसांत भिनलं आहे. त्यामुळं मरणानंतर वाटणा-या शाश्वत दुःखाला ते फारसं महत्त्व देत नाहीत. मेला की जगण्याच्या शापातून मोकळा झाला! असंच तिथल्या दारिद्रय—पीडीतांकडं पाहणाराचं तत्त्वज्ञान आहे. आणि "जगणं म्हणजे दुःखी जीवनाचा शाप भोगणं" हे तत्त्वज्ञान दुष्काळी प्रदेशापूरतं ठीकच आहे. तरीसुध्दा या कथेतील स्त्रियांच्या दुःखाचं स्वरूप आणि तेथील दुष्काळी माणसांचे सदरचं तत्त्वज्ञान हे महाराष्ट्रातील इतर प्रदेशातही अनेकवेळा पहावयास मिळतं. अन् इथंच त्यांची प्रादेशिकता वैश्विकतेशी नातं जोडताना दिसते.

### ३. राजकीय जीवनाभोवती फिरणा-या आणि दलित जीवनाभोवती फिरणा-या कथाः-

( सदर कथासंग्रहात राजकीय जीवनाभोवती फिरणा-या कथा आणि दलित जीवनाभोवती फिरणा-या कथा संख्येने अल्प आहेत. त्यामुळे त्यांचा विचार एकत्रित केला आहे. )

#### राज्यात दुष्काळ पडतो :-

ही एक प्रतिकात्मक उपहासगर्भ कथा आहे. मुख्यतः सांगोला प्रदेश हा पावसाचं कमी प्रमाण असलेला प्रदेश आहे. त्यामुळे शेतीव्यवसायावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. अन् अनेकदा तेथे दुष्काळ पडतो. ही कथा तेथील दुष्काळी पार्श्वभूमीला नकळत उठाव देऊन जाते. या कथेत एकीकडे राजाच्या आणि त्याच्या

मंत्रीमंडळाच्या सुखासीन जीवनाचे व समृध्द वैभवाचे भरतारी वस्त्र विणले आहे. तर दुसरीकडे जनतेच्या दारिद्रयाची टाकाऊ लत्करे गोळा करून, त्या भरतारी वस्त्राजवळ टांगली आहेत। जनहिताकडे दुर्लक्ष करणा-या स्वार्थी राजकारण्यांचे बुरखे फाडण्याचा या कथेतून यशस्वी प्रयत्न केला आहे. या कथेतील प्रादेशिक पार्श्वभूमीची राजकीय जीवनावर ठळक छाप पडली आहे.

## केवळ प्रजेच्या सुखासाठी :-

ही सुध्दा आणखी एक उपहासात्मक राजकीय कथा. दरिद्री जनता अन्नावाचून उपाशी मरते. उपासमार हे जनतेच्या मरणाचे कारण आहे म्हणूनच उपासमार टळल्यावर मृत्यूही टळेल, हा सरळ आणि रास्त विचार त्या राजाच्या नापिक डोक्याला शिवत नाही। उलट माणूस कशा-कशामुळे मरतो? हेच तो शोधू लागतो. तेव्हा त्याचे मुर्ख मंत्रीमंडळ त्याला सल्ला देते की, "माणूस हृदयविकार, मधुमेह इत्यादीमुळं मरतो." तेव्हा तो राजा हे रोग का उद्भवतात ते शोधतो. तेव्हा त्याला समजतं की, हे रोग - साखर, खाद्यतेल, स्निग्ध पदार्थ, अन्नधान्य इ. जीवनावश्यक वस्तुंमुळे उद्भवतात. त्यावेळी तो मुर्ख राजा या जीवनावश्यक वस्तू जनतेला सहजासहजी मिळणार नाहीत याची व्यवस्था करतो। जनतेचे हित करण्याच्या नावाखाली तो जनतेचे अनहित करतो. आणि अनहित करत असतानाही म्हणतो, "आम्ही जे करतो ते केवळ प्रजेच्या सुखासाठी।" या कथेत आलेलं उघडंनागडं दारिद्रय आणि अंगावरच्या वस्त्रांच्या चिंध्या झालेली अर्धनग्न प्रजा, हि कळत-नकळत सांगोला परिसरातील जनतेच्या उघडया नागडया दारिद्रयाशी नाते सांगून जाते.

## येशा :-

ही कथा म्हणजे जन्माने दलित असणा-या तरूणाचे व्यक्तिचित्रण. ही कथा दलित जीवनाभोवती फिरणारी आहे असं प्रकर्षानं जाणवत नाही. तरीपण दलित कुटुंबात जन्मलेली मुलं ही गावाच्या दृष्टीनं ओवाळून टाकलेली असतात, असं त्या तरूणाला तरी वाटतं. या कथेतील येशा हा जातीनं मांग आहे. परंतु लेखकाचा तो जिवाभावाचा मित्र आहे. चो-या करण्याचा येशाला भारी शौक आहे. तरीही, तो ज्या चो-या करतो त्या फार मोठया नाही. तर खाण्यापिण्याच्याच

तो चो-या करत असतो· यातून त्याची निधडी वृत्ती अधिकच बेडर होत जाते· तो अतिशय बुध्दीमान आणि चाणाक्ष असूनही, शाळा शिकणं ही बाब त्याच्या वाटयाला येत नाही· एक दोन प्रसंगातून लेखकानं त्याच्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडवलं आहे· पुढे हा येशा हातभट्टीच्या दारूचा धंदा टाकतो· लेखक हे प्राध्यापक झाल्यानंतर त्याची भेट घेऊन, आपल्या संस्थेत त्याला शिपाई म्हणून नोकरी मिळवून देणार असल्याचे सांगतात· यावर येशा त्यांना विचारतो की,– "तुमच्या संस्थेत सिपायाला किती पगार मिळतो?" "मिळतात की तीनसे-साडेतीनशे· शिवाय आठवडयातून एकदा सुट्टी!" असे लेखक त्याला अभिमानानं सांगतात· पण त्यांचे हे बोलणं ऐकून येशा त्यांना म्हणतो, "मालक, माझ्या धंदयात मी सातशे रूपये कमावतो· शिवाय आठवडाभर सुट्टीच· तुमच्याकडंचाच एकादा सिपाय द्या पाठवून मला· माझ्या हातभट्टीच्या धंद्यात माणसं कमी पडत्यात· मी देतू तेवडा पगार त्याला!"

तात्पर्य - दलितांचे उपेक्षित जीवन जगलेल्या या येशाला प्रतिष्ठा-अप्रतिष्ठा यातला फरक काय कळणार? आणि प्रतिष्ठित जीवन त्याच्या वाटयाला तरी आलं होतं कुठं? एकूणच त्याच्या जीवनाबद्दलच्या जाणीवा बदललेल्या आहेत· त्याच्या या बदलत्या जीवनजाणीवांत, त्याची पूर्वाश्रमीची प्रादेशिक पार्श्वभूमी म्हणजेच तेथील सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती जबाबदार आहे, असेच म्हणावे लागेल·" प्रादेशिक साहित्यातील पात्रांच्या वृत्ती प्रवृत्तीवर तेथील स्थितीशील (पारंपारिक) जीवनाचा प्रभाव पडलेला असतो· त्यामुळेच त्यांच्या बदलत्या जीवन जाणीवांना तेथील पारंपारिक स्थितीगती म्हणजेच तेथील सामाजिकता, सांस्कृतिकता इत्यादी घटक जबाबदार असतात·" असे डॉ·मदन कुलकर्णी[2] यांचे प्रातिनिधिक मत, येशाच्या बदलत्या जीवन जाणीवांचा, तेथील प्रादेशिक स्थितीगतीशी अन्वयार्थ लाऊ शकते· म्हणूनच येशाचे व्यक्तिमत्त्व हे प्रदेश संस्कारातून घडले आहे, हेच दाखवून देता येते·

## 4· पांढरपेशी जीवनाभोवती फिरणा-या कथा आणि इतर कथा :-

✓ पांढरपेशी जीवन चित्रण हे प्रादेशिक साहित्याशी प्रदेशनिहाय जवळीक साधतेच असे नाही· परंतु तशी जवळीक साधणारे साहित्य प्रादेशिक साहित्याला जवळ जाते· भोसल्यांच्या कथांतही पांढरपेशी जीवन चित्रण आले आहे, ते या प्रादेशिकतेशी जवळीक साधते, की नाही? हे इथे पाहता येईल·

### ऑफ पिरियड :-

या कथेतले बोडके सर लागोपाठ तासावर जाऊन कंटाळलेले असतात· आता त्यांचा पिरियड ऑफ असतो· परंतु हेडमास्तरांच्या जुलमी हुकूमामुळं त्यांना इ·5 वी च्या वर्गावर जाण्याची फर्माईश होते· मनात नसतानाही ते तासावर जातात· या वर्गातील मुले अतिशय वात्रट, खोडसाळ अन् इरसाल असतात; याचे अनेक विनोदी किस्से या कथेत येतात· आधीच मानसिक स्वास्थ हरवलेले बोडके सर अधिकच हैराण होतात· येनकेन प्रकारे वर्गावर ताबा मिळवण्याची केविलवाणी धडपड करतात· परंतु त्यात त्यांना यश येत नाही· मुले त्यांचा पिरियड वाया घालवतात· तासाला काही शिकवले तर जात नाहीच· एका अर्थी पिरियड ऑफ गेल्यासारखाच असतो· परंतु त्या ऑफ पिरियडचं समाधान मात्र त्या शिक्षकाला मिळत नाही। या कथेवर प्रदेशविशिष्ट घटकांचा कोणताच प्रभाव जाणवत नाही· परंतु त्यांच्या कथेतील विद्यार्थी पात्रे परस्परांना चिडवताना ज्या शाब्दीक कोटया करतात, त्या सांगोला परिसरातील विद्यार्थ्यांच्या नि लहान मुलांच्या परिभाषेशी जवळीक साधतात· ही कथा व्यापक पातळीवरचं वैश्विक नातं साधते·

### झोप :-

ही आणखी एक पांढरपेशी जीवनाभोवती फिरणारी कथा· मिलनातूर झालेल्या पतीपत्नीला त्यांच्या लहान मुलांची "झोप" लागल्याशिवाय विनाघोर एकांत मिळणार नसतो· त्यातूनच त्यांची आतूरता वाढत जाते· आणि ते मुलाला झोपी जाण्याची आसक्ती करतात· यातून त्यांची एकांत मिळवण्याची केविलवाणी धडपड स्तिमित करून जाते· त्यांच्या 5/6 वर्षीय मुलाला ≬बंडयाला≬ मात्र आई-वडिलांनी झोपी जाण्याची सक्ती करणं, विचित्र वाटतं। ते आज असे का वागतात? याचे

गुढ त्याच्या बालसुलभ बुध्दीला उलघडत नाही· केवळ त्यांच्या आसक्तीमुळंच तो झोप लागल्याचं नाटक करतो· थोडयाच वेळात मिलनोन्मुख आईवडिलांचे संवाद त्याच्या कानी पडतात· त्या संवादाचं रहस्य बंडयाला कळत नाही· परंतु, बंडयानं निरागस मनानं मांडलेले संवाद वाचकाला हास्यकल्लोळात बुडवून टाकतात!

या संग्रहातील "ऑफ पिरियड" व "झोप" या मुख्यतः पांढरपेशी जीवनाभोवती फिरणा-या कथा· निदान "ऑफ पिरियड" मधील विद्यार्थी पात्रे तरी, प्रादेशिक परिभाषा बोलतात परंतु "झोप" या कथेत मात्र कोणताच प्रादेशिक परिणाम साधला गेला नाही· त्यामुळे ती प्रादेशिक पात्रे नजरेसमोर ठेऊन लिहली गेली असल्यासही ती प्रादेशिक आहे असे म्हणता येणार नाही·

### बाबूराव न्हावी :-

हा अत्यंत बेरको माणूस· "काम तर विशेष करायचं नाही, आणि उपासी तर मरायचं नाही·" हेच त्याच तत्त्वज्ञान। अडाणी लोकांना फसवणं, त्यांना टोप्या घालणं, त्यांची लुबाडणूक करणं हा त्याचा एकमेव उद्योग· फुकटखाऊ आणि कमालीचा आळसी· त्यामुळे न्हावकीच्या पारंपारिक धंद्याकडं त्याचं दुर्लक्ष झालेलं असतं· लेखकाचीही एकदा त्यानं फजिती केलेली असते· या पात्राचं जीवनदर्शन लेखकानं इतके समर्पक रेखाटले आहे की, "माडगूळकरांच्या माणदेशी माणसांना" ते जवळ जाताना दिसतं· त्याची प्रत्येक कृती-उक्ती जीवंत होऊन आली आहे· त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक-एक विचित्र पैलू उलगडत जाताना वाचक मनसोक्त हसत सुटतो· असा हा हुरहुन्नरी, रगेल आणि रंगेल बाबूराव न्हावी आयुष्याच्या अखेरीपर्यंत आपल्या तत्त्वज्ञानाला चिकटून राहिलेला दिसतो· इतकंच काय पण शेवटी त्यानं ते तत्त्वज्ञान कोळूनच पिलेले दिसते। ···· प्रादेशिकतेचा अन्वयार्थ येथे विनोदी पध्दतीने लावता येतो, तो असा की, बाबूराव न्हावी हा बारा बलुतेदारांपैकीच एक आहे· परंतु पारंपारिक धंद्याशी अनेकदा गद्दार करूनही, तो या दुष्काळी प्रदेशातलं तेरावं बलूतं ठरतो, एवढे मात्र निश्चित।

**वरात :-**

या कथेतल्या भिका नरसाळ्याचं न ठरणारं लग्न ठरतं आणि पार पडतं· त्याचे मित्रमंडळी त्याची वरात काढण्याचे ठरवतात· गावातील लोकांनी त्याची अनेकदा लग्न मोडवलेली असतात· म्हणूनच या लग्न मोडवणारांच्या नाकावर टिच्चून वरात काढायची, असं ठरतं· भिका नरसाळ्याची इच्छा नसतानाही, त्याचे मित्र त्याला हाणून-मारुन मुसलमान करतात· परंतु, खोडसाळ आणि मरतुकडं घोडं मिळण्यापासून ते नानाविध संकटांनी त्या वरातीचा कसा बो-या वाजतो , याचं हास्यकारक चित्रण या कथेतून येतं· या कथेत काही प्रदेशविशिष्ट ठिकाणांचा उल्लेख येतो· काही दुष्ट लोक एखाद्याचं लग्न मोडवण्याचा कपटी खटाटोप करीत असतात याचा सार्वत्रिक प्रत्यय येताना दिसतो· तरीही सांगोला परिसरातील रितीरिवाज या कथेतून बारकाव्यानिशी टिपले आहेत·

**मुलाखत :-**

या कथेतल्या सरपंच अदिकरावांचा मुलगा सोन्या, हा रडत कढत कसाबसा बी·ए·पास होतो· एकूलता एक आणि घरचं अफाट वैभव, यामुळं त्याला नोकरीची गरज नसते· नाहीतरी सोन्या हा नोकरीच्या क्षेत्रात निरुपयोगीच असतो· शिक्षणक्षेत्रातील त्याच्या अप्रगतपणाचे अनेक विनोदी किस्से या कथेत येतात· परंतु, त्यानं केलेल्या अर्जानुसार त्याला नोकरीचा कॉल आलेला असतो· एक गंमत म्हणूनच तो या मुलाखतीला जाण्याचं ठरवतो· आणि मुलाखत घेणारांचीच मुलाखत घेतो, याचं आगळं दर्शन या कथेतून घडतं· शेतकी जीवनावर आधारीत सोन्यानं घेतलेली मुलाखत, ही त्या प्रदेश जीवनाच्या आकलनाचीच सांगता करून जाते·

**लढत :-**

पाहुण्यारावळ्यांच्या वाढत्या वर्दळीची झळ लेखकाला कशी लागते? याचे विनोदपूर्ण दर्शन ही कथा घडवते· या कथेत लेखकाच्या घरी उतरलेल्या पाहुण्यांच्या खादाडपणाचे, लंपटपणाचे आणि निर्लज्जपणाचे एक-एक पैलू लेखकाने मिस्कीलतेने चित्रित केले आहेत·

अशाप्रकारे त्यांच्या सदर कथासंग्रहामध्ये विषयाचे आणि आशयाचे वैविध्य आढळून येते. एखादं दुसरा अपवाद वगळता, यातील जवळजवळ सर्वच कथांवर तेथील प्रादेशिकतेचा प्रभाव असल्याचं दिसून येतं. म्हणूनच त्यांचा "अगं अगं म्हशी" हा कथासंग्रह प्रादेशिकच आहे, असे मला वाटते. येणेप्रमाणेच त्यांच्या "पाऊस" या कथासंग्रहातील कथांचीही प्रादेशिकतेच्या अनुषंगानं चर्चा करावयाची आहे. ती चर्चा पुढीलप्रमाणे -

पाऊस :-

हा द.ता.भोसल्यांचा आणखी एक कथासंग्रह. हा 1984 मध्ये प्रसिध्द झाला. या कथासंग्रहात एकूण 17 कथा आहेत. (या कथासंग्रहातील कथांतून संवाद रूपाने आलेली ग्रामीण-प्रादेशिक बोली, प्रादेशिकतेचे अंग अधिक-अधिक चैतन्यमय करते. या कथा मुख्यतः प्रदेश जीवनाभोवती फिरताना दिसतात.) "अगं अगं म्हशी" या कथासंग्रहातील कथांप्रमाणेच याही कथासंग्रहातील जीवन दर्शन हे सांगोला {पंढरपूर} परिसरातील आहे. यातील काही कथांतून झोपडवाशीय जीवनही आले आहे. ग्रामीण प्रदेशातील स्त्रीजीवनाचं दुःखपूर्ण चित्रण हे या कथासंग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्टय.

खरे तर सांगोला हा दुष्काळग्रस्त प्रदेश असल्याने खोपटवाशीय तथा झोपडवाशीय जीवन जगणारे लोक तेथे अधिक आहेत. या परिसरातील सामान्य, अतिसामान्य आणि दरिद्रयपीडीत माणसांच्या जीवनातील दुःख, दैन्य, दारिद्रय, उपासमार, हालअपेष्टा, व्यथा आणि वेदनाच त्यांच्या या कथांतून अधिक्याने चित्रित झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या या कथासंग्रहावर दुःखाची दाट सावट पसरली आहे. कारण हे जीवन लिन, दीन, दलित, पतीत लोकांचेच उपेक्षामय जीवन आहे. याहीपेक्षा लेखकाने स्वतः कधी काळी जगलेले, भोगलेले, अनुभवलेले असेच हे जीवन आहे. म्हणूनच अनुभवातील सहजता लेखकाला या कथांतून जीवंतपणे साधता आलेली दिसते. अर्थातच त्यांच्या या कथाना सत्यानुभूतीचे अधिष्ठान प्राप्त झालेले दिसते. हातावर पोट भरणा-या लोकांच्या जीवनातील दुःख आणि दैन्य सहृदयतेने चित्रित करण्याकडेच त्यांचा अधिक कल दिसतो. किंबहूना कधीकाळी

हातावर पोट भरणा-या, अठराविश्वे दारिद्र्याने पीडलेल्या कुटुंबातच त्यांचा जन्म झाला, याचाही परिणाम असेल कदाचित· परंतु दारिद्र्याने, दुःखाने, ग्रासलेल्या लोकांचे चित्रण ते प्रभावीपणे आणि जीवंतपणे करतात, हेच खरे· अनुभवातले कटूसत्य ते अत्यंत भेदक आणि वेधक शब्दांत व्यक्त करतात· खरेतर या कथासंग्रहातील ब-याच कथा या गंभीर आत्मचिंतनात्मक, तत्त्वचिंतनात्मक अशाच आहेत·

यातील काही कथा या शेतकी प्रदेश जीवनातील सुखदुःखांवर प्रकाश टाकताना दिसतात· काही कथा या ग्रामीण स्त्रीयांच्या सुखदुःखाला वाचा फोडताना दिसतात· काहीतून दलितांच्या दुस्थितीचे नि राजकीय स्वार्थाचे दर्शन घडते· तर काही कथा या झोपडवाशीय जीवनाभोवती नि इतर जीवनाभोवती फिरताना दिसतात· काही अपवाद वगळता, ही सारी जीवनचित्रणे शेवटी प्रादेशिक साहित्यांतच समाविष्ट होतात· परंतु ज्या जीवनदर्शनाच्या प्रमुख हेतूने जी कथा लिहिली आहे; त्याच जीवनदर्शनाच्या अनुषंगाने तिचा अभ्यास करणे गरजेचे ठरते· म्हणूनच अभ्यासाच्या दृष्टीने या कथांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करणे मला श्रेयस्कर वाटते - 1· शेतकी प्रदेश जीवनाभोवती फिरणा-या कथा, 2· स्त्रीयांच्या जीवनाभोवती फिरणा-या कथा, 3· राजकीय जीवनाभोवती फिरणा-या कथा आणि दलित जीवनाभोवती फिरणा-या कथा आणि 4· झोपडवाशीय जीवनाभोवती फिरणा-या कथा आणि इतर कथा, असे हे विभाजन करता येते आणि या सा-यांचा तपशीलवार आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो·

## 1· शेतकी प्रदेश जीवनाभोवती फिरणा-या कथा :-

### पाऊस :-

ही कथा शेती जीवनाभोवती फिरते असं म्हणता येत नाही· तरीही अपवादानं या कथेतील भागूचा शेतीजीवनाशी आणि ग्रामीण प्रदेश जीवनाशी जवळचा परिचय असावा असे वाटते· कारण ती वेळप्रसंगी शेतमजूरीचे काम करणारी, खोपटात राहणारी स्त्री आहे· याहीपेक्षा "पाऊस" आणि शेतकरी यांचे चित्रण त्यांच्या अनेक कथांतून येते· शेतीचे पावसावरचे अवलंबून असणे हा येथील प्रदेश विशेष· म्हणून

पावसावर अवलंबून असणारा शेतीव्यवसाय व पावसाने निर्माण होणारे वातावरण याचे प्रत्ययकारी चित्रणही भोसले रेखाटतात· एकूण या पावसाचा त्यांच्या प्रदेश जीवनावर, त्यांच्या पात्रांवर इष्ट अनिष्ट परिणाम हा होतच असतो· किंबहूना त्यांच्या ब-याच कथांतून पावसाचे चित्रण आले आहे· "पाऊस" हे त्यांच्या कथेतील अविभाज्य पात्र आहे· यादृष्टीने त्यांच्या सदर कथासंग्रहाचे "पाऊस" हे शीर्षक समर्पक वाटते·

**ढासळलेली भिंत :-**

या कथेतला नायक दारिद्र्यपीडीत शेतमजूर कुटुंबात जन्मलेला· अठराविश्वे दारिद्र्यात शिक्षण घेऊनही त्याला नोकरी मिळत नाही· त्याच्यासाठी पाठच्या भावानं, बहिनीनं आणि आईनं स्वतःच्या अंगावरच्या चिंध्या जपल्या· अन् त्याच्या शिक्षणाला हातभार लावला· नोकरीच्या क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार आणि वशिला यामुळं त्याचा साराच विरस होतो· मुलाखतीतला फोलपणा त्याला पटलेला असतो· आपलं बांडगूळाचं जीणं त्याला असह्य होतं· घरातील मजूरी करणारे लोक त्याला स्वावलंबी वाटतात· नोकरी नाही पण, निदान त्यांच्यासारखे तरी मजूराचे जीवन जगावे, असे त्याला वाटते· पण त्याच्यामध्ये अन् घरातील लोकांमध्ये पदवीची भिंत असते· परंतु ही पदवीची भिंत ढासळून घरातील लोकांप्रमाणं शेतमजूरी करण्याचा तो निर्णय घेतो· यासाठी तो आपली सारी कागदपत्र जाळून टाकतो, याचं हृदयाला पिळ पाडणारं दर्शन या कथेमध्ये घडतं·

तपशीलातील भिन्नता आणि परिणामाची भिन्नता एवढे वेगळेपण सोडल्यास, आशय-विषयदृष्टया ही कथा आनंद यादवांच्या "भोवळ"[3] या कथेला जवळ जाताना दिसते· या कथेतील तरूणाची नाळ सांगोला प्रदेशातील दारिद्र्यपीडीत शेतमजूर कुटुंबाशी जोडली गेल्यामुळं, त्याला या जीवनापासून अलग होणं दुरापास्त ठरतं·

**जन्म :-**

ही कथा शेतात राबणा-या सालगडयाच्या दुर्दैवी आणि उपेक्षीत जीवनावर विदारक प्रकाश टाकते· या कथेतला गेना हा सालगडी· त्याची बायको गरोदर आहे· अवघडलेली आहे· पहिलं बाळंतपण थोडं अवघडंच· म्हणून गेनाचा जीव अडकलेला असतो· पण मालकाची म्हैस अडल्यामुळं मालक त्याला पुढं घालून वस्तीवर नेतो· मालकाची म्हैस रेडकाला जन्म देते· पण गेनाची बायको मात्र मृत्युला बळी पडते· यातलं गेनाच्या मानसिक कोलाहलाचं चित्रण सुन्न करुन जातं·

**सुटका :-**

या कथेचा आशय-विषय "जन्म" कथेला समांतर जातो· यातील दामा हा सालगडी· दामाची बायकोही गरोदर असते· दिवस भरलेले असतात, कळा सुरु झालेल्या असतात· बाळंतपण म्हणजे स्त्रीचा पुनर्जन्मच· म्हणून बाई बाळंत होईपर्यंत काळजी असते· दामाला बायकोच्या सुटकेची काळजी आहे· पण मालकाच्या कामात त्याला घरी थांबता येत नाही· मालकाच्या अडलेल्या म्हैशीची सुटका करण्यासाठी, मालक दामाला घेऊन जातो· मालकाच्या म्हैशीची सुटका होते पण दामाची बायको मात्र बाळंतपणात मरण पावते·

**ऊन :-**

या कथेतही दुस-याच्या शेतावर राबणा-या "तात्या" या सालगडयाच्या उपेक्षामय जीवनाचे दर्शन घडते· या कथेत शेतमालकाचा मुलगा आणि तात्याचा मुलगा यांची सर्वच बाबतीत तुलना करुन, लेखकाने या कथेवर दुःखाचे गहिरे सावट पसरविले आहे·

या सर्व कथांतून शेतमालकांच्या खेटरांइतकी, तथा त्यांच्या जनावरांच्या जीण्याइतकीही, सालगडयांच्या जीण्याला किंमत नसते, या थरारक कटूसत्यावर या कथा प्रकाश टाकतात· विशेषत्वानं या कथा, सांगोला परिसरातील सालगडयांच्या उपेक्षामय जीवनाचे प्रतिनिधीत्व करताना दिसतात·

2· **स्त्रीयांच्या जीवनाभोवती फिरणा-या कथा :-**

या सदरात समाविष्ट होणा-या कथा या मुख्यतः स्त्रीयांच्या दुःखाचा आणि त्यांच्या करपून गेलेल्या स्वप्नांचा यथार्थ आविष्कार करण्याच्या हेतूनेच लिहल्या गेल्या आहेत· ग्रामीण प्रदेशाशी बांधल्या गेलेल्या स्त्रीयांच्या दुःखाची कारणमीमांसा, म्हणजेच या कथा असे म्हटले तर ते योग्य ठरेल· सांगोला परिसरातील सामान्य आणि अतिसामान्य स्त्रीयांच्या दुःखांचे अनेकविध पैलू, लेखकाने या कथांतून उलघडून दाखवले आहेत· या कथांचा विचार खालीलप्रमाणे -

**पाऊस :-**

या कथेतील भागू रंडकी मुंडकी बाई· फाटका प्रपंच· त्यातंच नाचाराला भर म्हणून, देवानं दोन मुलं पदरी घातलेली· पडेल तो रोजगार करणारी ही स्त्री· पण लागून राहिलेल्या पावसामुळं तिला रोजगार मिळत नाही· त्यामुळं जीवघेणी उपासमार वाटयाला येते· दुःखात भर म्हणून तिचं एकूलतं एक पोरगं आजारी पडतं· उपासमार टाळण्यासाठी प्रसंगी तिच्या पोरीवर भिक मागण्याची वेळ येते· पण भिक सुध्दा मिळत नाही· तेव्हा, आजारी पोराच्या पोटात दोन घास जावेत यासाठी ती स्वतः खोपटातून बाहेर पडते· आणि दुस-यांनी उकीरडयावर फेकून दिलेला उष्टा मसालेभात गोळा करून आणते व पोराला खाऊ घालते· परंतु तो भात विटलेला असतो· त्यामुळेच पोराला विषबाधा होते आणि ते हाताबाहेर जाते· यावेळचा तिचा आक्रोश पाहून, अंतःकरणात दुःखाचे गहिरे सावट पसरत जाते·

**बाजार :-**

या कथेतील नायिका चंपा· बाप लहानपणीच वारलेला· नवरा एका पोराला जन्म देऊन परागंदा झालेला· तिचं ते लहान पोरंगं, तिची म्हातारी आई आणि ती स्वतः अशा तिघांची पोटं तिच्या एकटीवर अवलंबून असतात· अशा या चंपाला शेतमजूरीशिवाय दुसरा पर्यायच नसतो· परंतु शेतमालक देसायाची तिच्यावर पापी नजर असते· समाजातील बुभूक्षीत नजरांपासून तिचं रक्षण करणारं कुणीच नसतं; याची तिला सदैव रुखरुख वाटायची· यादृष्टीनं तिचं आत्मगत विलक्षण बोलकं वाटतं, - "किती दिस असं जगायचं? माणसाची जात आपणाला नीट

तरी जगू देतीया? दिसरात डोळ्यांच्या सुया अंगावर लाळ गळावी तशी वासना अंगावर सांडती· नवरा नसलेली बाई म्हणजे यांना खिशातल्या सुपारीसारखी वाटतीया· मनात आलं की कातरून कुसकुरून तोंडात टाकली· त्यामुळं तर हा जल्म नकूं-नकूंसा झालाय·" आणि एक दिवस ती देसायाच्या पापी वासनेची शिकार ठरते· तेव्हा, जीवन जगणं, पोट भरणं हीच एक समस्या कशी होऊन जाते? याचे हृदयभेदक चित्रण इथे पहावयास मिळते·

विनवणी :-

या कथेत नव-यानं त्यागलेल्या स्त्रीच्या उपेक्षामय जीवनाचे कारूण्यमय चित्रण प्रकट झाले आहे· एका पोराला जन्म देऊन, तिचा नवरा शेजारच्या गांवात (गादेगांवात) बाई ठेऊन राहिलेला असतो· तरीसुध्दा ती डगमगत नाही· नव-यानं दिलेलं दुःख ती पोराकडं पाहून विसरलेली असते· परंतु एक दिवस तिला क्षयाची लागण होऊन, ती मृत्युशय्येकडे सरकते· यावेळी तिचा बारा-तेरा वर्षाचा मुलगा बापाकडे जाऊन, "आईला भेटून जाण्याची" विनवणी करतो· त्याची ही केविलवाणी धडपड आणि त्या धडपडीला आलेलं अपयश पाहून, हृदयात अगदी कालवाकालव होऊन जाते·

जहाज :-

या कथेत दुस-याच्या घरची धुणी-भांडी करणारी जिजा भेटते· तिच्या संसारविषयक मधूर स्वप्नांचा झालेला चक्काचूर, आयुष्याच्या अखेरीपर्यंत तिच्या नजरेसमोर तरळत राहतो तिला संसारसुख नि मातृसुख औषधालाही मिळत नाही· एखादं दुसरा क्षणिक प्रसंग सोडता, तिला पतीसुख मिळालंच नाही· तिची मातृत्वाची इच्छा एवढी जबरदस्त असते की, वेगळ्या मार्गानंही आपणास ती पूर्ण करता आली असती, असले घाणेरडे विचारही तिच्या मनात येतात· ती सावकाराच्या घरी कामाला असताना त्यानं तिचा धरलेला हात तिला आठवतो· तसेच त्यानं तिच्याशी लग्न करण्याचं दाखवलेले आमिषही तिला आठवतें· परंतु त्यावेळीच शेणानं बरबटलेल्या हातानं,

तिनं त्याचं रंगवलेले थोबडही तिला आठवतं· कदाचित आपण तेव्हा असं करायला नको होतं, कदाचित आपली मातृत्वाची इच्छा तेव्हा पूर्णही झाली असती· असले विचित्र विचारही तिच्या मनात येत असतात· पण त्याचवेळी ते विचार गैर आहेत, याचीही तिला जाणीव होते· तरीसुध्दा वांझ राहिलेल्या स्वप्नांचा विचार करत करत, तिचं बिनशीडाचं मनरूपी जहाज, आयुष्याचा प्रवास अखंड चालू ठेवतं - अव्याहतपणे!

**निर्णय :-**

या कथेत मजूरी करणा-या स्त्रीच्या कर्तृत्वाचे एक आगळेवेगळे दर्शन घडते· नवरा काम करीत नाही· सासू आणि मुलं यांचे पोट तिच्या एकटीच्या मजूरीवर असते· पडेल ती मजूरी करणारी ही बाई विलक्षण कष्टाळू आहे· तिची संसाराची आणि कुटुंबकर्तव्याची प्रचंड आसक्ती पाहून तिच्या तकलादू व संसारपराङ्मुख नव-याची चीड आल्यावाचून रहात नाही· सासू-मुलं यांना पोसायचे असेल तर, पोटात राहिलेले मूल होऊ देता कामा नये, हा तिने स्वतः घेतलेला निर्णय संकटाशी झुंज देण्याच्या तयारीनिशी घेतलेला दिसतो·

**कोसळलेली :-**

या कथेत कोसळू पाहणा-या संसाराला सावरू पाहणारी दुर्दैवी स्त्री भेटते· ती बिकट परिस्थितीला समर्थपणे सामोरी जाते· नव-याला आजारातून बरे करण्यासाठी घरातील किडूक मिडूक विकते· पण कारणापूरतेही पैसे न जमा झाल्याने, देवळातील देवाच्या मुर्तीही चोरून आणते· देवाची चोरी म्हणजे पाप हे माहित असूनही तिचा नाईलाज झालेला असतो· परंतु, शेवटी तिच्या धडपडीला न येणा-या यशामुळं ती कोसळून पडते·

हे स्त्रीचित्रण - सांगोला (पंढरपूर) परिसरातील ग्रामीण स्त्रीयांच्या जीवनाचंच प्रातिनिधीक चित्रण असलं तरी, इतर प्रदेशातील स्त्रीजीवनातही तेच दिसून येतं· त्यामुळं या प्रादेशिकतेला व्यापकता येते·

## ३. राजकीय जीवनाभोवती फिरणा-या आणि दलित जीवनाभोवती फिरणा-या कथाः-

### निवडणूक :-

राजकीय गैरसमज विकोपाला गेल्यानं - सवर्णीयांच्या राजकीय स्वार्थाचा बळी ठरलेल्या एका निष्पाप दलिताची ही हृदयस्पर्शी कारूण्यकथा. चांगा महार हा हातावर पोट भरणारा दारिद्र्यपीडीत माणूस. त्याच्या मनात नसतानाही सवर्णीय मंडळी त्याला निवडणुकीला उभे करतात. तो निवडून येतो. मात्र चांगा हा सरळमार्गी आणि निष्पाप असूनही, परस्परांचे विरोधक असणा-या दोन मातब्बर सवर्णीयांच्या मनात त्याच्याबाबत गैरसमज निर्माण होतो. आणि एका रात्री चांगाच्या खोपटाला आग लावली जाते. त्यात त्याचा संसार जळून खाक होतो. सर्वस्व जळाल्यासारखा! ही आग कुणी लावली असावी, याचा अंदाज चांगाला असतो. पण तो परिस्थितीचा मारा असतो. चांगाच्या या दुःखाचे चित्रण लेखकाने इतक्या जीवंतपणे रेखाटले आहे की, डोळ्यात पाणी उभे राहिल्यावाचून रहात नाही. जन्मानं दलित असणा-या आणि स्वतःला दलित म्हणवून घेणा-या कुणाही दलित लेखकाला लाजवेल, इतक्या समर्थपणे भोसल्यांनी या कथेतल्या दलिताचे चित्र जीवंत केले आहे. दलित साहित्यिकांच्या दलित साहित्याविषयीच्या व्याख्येनुसार, ते दलित ठरणार नाही हे खरे आहे. पण मी त्याला प्रादेशिक साहित्य म्हणतो.

### वाढदिवस :-

या कथेत भागू म्हारीन आणि तिचा मुलगा भीमा या दलितांच्या शोषणाची चित्तरकथा येते. दलितांना राबवून घेऊन त्यांची कशी अवहेलना केली जाते, याचे चित्र येथे पहावयास मिळते. ग्रामीण प्रदेशातील सामंतशाही, शोषणशाही अजूनही कशी संपुष्टात आलेली नाही याचे ही कथा म्हणजे एक उदाहरण ठरतात.

### मागणी :-

या कथेत आजारी असूनही घर सावरण्याची केविलवाणी धडपड करणारा बंका महार भेटतो. आजारपणापायी घरात पडून राहिल्यामुळं त्याची मिळकत आणि चूलही बंद झालेली असते. पोरांची उपासमार टाळण्याची आणि त्यांच्या पोटाला

दोन घास मिळवून देण्याची त्याची धडपड असते·म्हणूनच प्रकृती बरी नसतानाही तो आपला पोतराजाचा पारंपारिक पोशाख पेटीतून बाहेर काढतो· तेव्हा तो मनातल्या मनात म्हणतो, "ही पोतराजाची कापडं· देवाचा पोशाख· हेला कोण म्हणंल पोशाख? चार रंगाच्या मागून आणलेल्या चिंध्या या· आमा महारांच्या आयुक्षासारखाच हा पोशाख· मी तो घालणार पोशाख म्हणून, आन पोट जाळणार देवाच्या नावांवर"· त्यावेळी त्याच्या मनात पोतराजाच्या पारंपारिक पोशाखाची जाणवलेली हीनता अशी व्यक्त झाली आहे· तसेच त्यातील फोलपणही व्यक्त झाले आहे· हे केवळ देवाच्या नावावर पोट भरणे आहे, हे सत्य त्याला कळले आहे· ते त्याच्या मनात निर्माण होणा-या स्थित्यंतराचेच प्रतिक आहे· तो हा पोशाख घालून गावात जातो तेव्हा चक्कर येऊन त्याची जी दशा होते, त्यातून त्या पोशाखातीलच नव्हे तर त्याच्या जीवनातीलही फोलपणा लक्षात आल्यावाचून रहात नाही·

ग्रामीण प्रदेशातील तथा प्रादेशिक परिसरातील शोषीत माणसे प्रामुख्याने भोसल्यांच्या कथांचा विषय झालेली आढळतात· सर्व पातळीवरच्या शोषणाची, अन्यायाची जाणीव असूनही ही माणसे परिस्थितीच्या भोव-यात अडकलेली दिसतात· किंबहुना त्यांच्या आर्थिक परिस्थितीबरोबरच त्या प्रदेशातील प्रादेशिक परिस्थिती म्हणजेच तेथील सामाजिकता आणि धार्मिकता त्यांच्या माणूसपणाच्या आड येते·

## 4· झोपडवाशीय जीवनाभोवती फिरणा-या कथा आणि इतर कथा :-

झोपडपट्टी जीवनाभोवती फिरणा-या कथांत प्रामुख्याने "पाऊस" आणि "बाजार" या दोनच कथांचा समावेश होतो· वास्तविक या कथा झोपडवाशीय जीवनावर संपूर्णतः प्रकाश टाकतात, असे मात्र म्हणता येत नाही· तर, त्या फक्त झोपडवाशीय जीवनाशी बांधल्या गेलेल्या सामान्य, अतिसामान्य स्त्रीयांच्या उपेक्षामय जीवनाचेच अधिक्याने दर्शन घडवतात· झोपडवाशीय तथा खोपटवाशीय दारिद्र्यपीडीत स्त्रीयांच्या दुःखाचे चित्रण, हाच मुलतः या कथा लेखनामागील हेतू आहे· तरीसुध्दा अभावितपणे आलेले, झोपडवाशीय जीवनाचे भिकेकंगाल दर्शन, बरेच काही सुचवून जाते·

**देवपूजा :-**

ही कथा श्रीधरपंत आणि कावेरीबाई या ब्राम्हण जोडप्यांच्या दुःखी-कष्टी जीवनाची करूण कहाणी ठरते. मुले असूनही त्यांना विचारात नाहीत. नोकरीच्या गांवी बायका-पोरे घेऊन फिरत असतात. जराजर्र म्हातारपणानं ग्रासलेल्या या दांपत्यांच्या उदरनिर्वाहाचा एकमेव मार्ग म्हणजे - दुस-यांच्या घरची देवपूजा। रावाचा रंक व्हायला वेळ लागत नाही याचं उदाहरण म्हणजे श्रीधरपंत. जीवनात घोर दुःखाचे आघात पचवूनही त्यांचा आशावाद अजून लुळा पडलेला नाही. तो आशावाद फोल ठरणार आहे याची पुसटशी जाण असूनही ते खचत नाहीत हेच विशेष. कारण स्वतःची पोरं सांभाळत नसणा-या म्हाता-यांना दुस-यांचा देव तरी संभाळतोय, हेच त्यांचं अंतिम समाधान असतं।

**झुंज :-**

या कथेत स्वातंत्र्यप्राप्तीसाठी परकीयांशी निकराची झुंज देणा-या तात्यासाहेब देशपांडयांच्या व्यथामय जीवनाची कहाणी येते. स्वातंत्र्योत्तर काळात त्याना या देशभक्तीचं फळ काय मिळालं? तर तुरूंगवास, उपेक्षा, अवहेलना हेच मिळालं, याचं सहज सुलभ दर्शन या कथेतून घडतं. या कथेतील अनुभवाला व्यापक पातळीवरचा आकार प्राप्त झाला आहे त्यामुळे त्यातील प्रादेशिकता पुसट होऊन गौणस्थानी गेली आहे.

**भेट :-**

या कथेतील स्वामींना कुष्ठरोगाची लागण झालेली होती. त्यामुळे ते संसार त्याग करून घर सोडून निघून जातात. परमेश्वर कृपेने देहाची कोड नष्ट झाल्यामुळे उर्वरीत आयुष्य देवाच्या चरणी उगाळत बसण्याचा ते निर्णय घेतात. देह पूर्ववत निरोगी होतो. आणि निरोगी देहाला स्वप्नं पडू लागतात। निसर्गात दिसणारे प्रेमाचे रंग आणि मंदिरातील चिमण्यांचे प्रणयाराधन पाहून त्यांचे चित्त विचलीत होते. इतकेच काय पण एक अनोळखी स्त्री देवदर्शनासाठी मंदिरात येऊन, त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोलते. आणि हे स्वामी महाराज हुरळून जातात. त्यांचा

ब्रम्हचर्य आसक्तीचा निर्णय डळमळू लागतो. परंतु त्या स्त्रीच्या मनातील भाव नेमका काय होता? भक्तीचा की वेगळाच? याची खात्री न होता सुध्दा ते आपल्या वासनापूर्तीच्या विकृत स्वप्नरंजनात रममाण होतात. सांगोला परिसरात कुष्ठरोगाची लागण होणारे बहुतांशी लोक हे गृहत्याग करून, गांव सोडून - परमेश्वर चरणी विलीन होतात, ही तिथल्या कुष्ठरोग्यांची ऐतिहासिक परंपरा.

**अनावर :-**

ही या संग्रहातील शेवटची कथा. ग्रामीण परिसरामध्ये धरणे-कालवे यासारख्या विकास योजना राबवल्यामुळे उध्वस्त झालेल्या गावांशी संबंधीत एका उध्वस्त मनाचे दर्शन या कथेत घडते. या कथेतल्या "धर्मा" चे गांव धरणात गेले आहे. एका माळावर त्याचे पुनर्वसन झाले आहे. परंतु या ओसाड जागी त्याचे मन रमत नाही. तो धरणाकडे जाऊन आपले गांव नेमके कुठे होते याचा अंदाज घेऊ लागतो. परंतु पांढरा पसलेला तो पाण्याचा प्रदेश त्याला अधिकच अनावर करू लागला. त्याला काही सुचेना, काही समजेना. त्यानं दोन्ही हात वरती केले आणि मोठयानं तो ओरडला - "तिथंच, त्या तिथंच माझं घर हुतं. त्या दगडाच्या भिंतीच्या पोटातंच घर हुतं. आजून मला ते दिसतंय, आजून मला ते दिसतंय. आणि दुस-याच क्षणाला तो एखाद्या लहान पोरासारखा जमिनीवर पालथा पडून ढसाढसा रडू लागला." असा हा कथाआशय.

अशाप्रकारे द.ता.भोसले यांच्या कथांचा आढावा घेतल्यानंतर त्यांच्या कथांमध्ये आशय आणि विषयाचे वैविध्य असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे त्यांच्या (बहुतांश कथांवर तेथील प्रादेशिकतेचा प्रभाव असल्याचे जाणवते.) आणि तेथल्या प्रादेशिकतेच्या परिसस्पर्शाने त्यांच्या कथानुभवाना मानवी जीवनदर्शनाची, आणि प्रदेश जीवन दर्शनाची सूक्ष्म खोली प्राप्त झाल्याचे दिसते.) तसेच प्रादेशिक घटकांच्या प्रादुर्भावामुळे त्यांच्या कथासौंदर्यात भर पडलेली दिसते आणि त्यांच्या कथातील अनुभव विश्वाला सहजता आणि स्वाभाविकता प्राप्त झाल्याचे दिसून येते. मुख्यतः मानवी जीवनातील आशयाची प्रतिकात्मकता साधण्यासाठी त्यांच्या कथांतून आलेला निसर्ग

हा त्यांच्या कथेतील चित्रणाला आणि मानवी जीवनदर्शनाला अधिकच सुस्पष्टता, समर्पकता, अर्थपूर्णता आणि त्याचबरोबर सुंदरताही प्राप्त करून देतो.

त्यांच्या कथांतून आलेली प्रादेशिकता ही त्यांच्या प्रदेश आकलनाला प्रामाण्य मिळवून देते. दुष्काळी प्रदेशाचा भौगोलिक तपशील किंवा भौगोलिक परिस्थितीचे वर्णन मात्र त्यांच्या कथांतून येत नाही. परंतु दुष्काळी जीवन जगणा-या लोकजीवनाची आणि वातावरणाची निर्मिती त्यांच्या कथांतून आलेली आहे. त्यामुळेच त्यांच्या सांगोला परिसरातील दुष्काळी पार्श्वभूमीची सांगता करण्यास ती पूरेशी ठरते. उदा. "राज्यात दुष्काळ पडतो" ही कथा यादृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. किंबहुना भौगोलिक तपशील आला नाही तरी वातावरण निर्मितीतून त्या प्रदेशाची भौगोलिक वैशिष्टये प्रतित होऊ शकतात. याच संदर्भात डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात, "विशिष्ट प्रकारची भौगोलिक परिस्थिती निर्माण न करता सुध्दा वातावरण अथवा विशिष्ट जीवन पध्दतीची योजना केली जात असेल तरीही भौगोलिक पार्श्वभूमीचे कार्य पूर्ण होते."[4]

अर्थात भोसल्यांच्या कथांतून तेथील भौगोलिकतेबरोबरच, तेथील निसर्ग, सामाजिकता, सांस्कृतीकता, सामुहिकता आणि तेथील जीवननाट्य व समस्या यांचे प्रदेशनिहाय दर्शन घडते.

## द.ता.भोसले यांच्या कथेतील प्रादेशिकतेचे स्वरूप :-

द.ता.भोसले यांच्या कथासाहित्याला सांगोला (पंढरपूर) परिसरातील प्रादेशिकतेचे अंग लाभले आहे. हे प्रादेशिकतेचे अंग तेथील भौगोलिकता, निसर्ग, संस्कृती, सामुहिकता, सामाजिकता, तेथील समस्या आणि प्रदेशविशिष्ट बोली इत्यादी घटकांच्या कमी-अधिक आविष्कारातून सामग्र्याने ध्वनित होताना दिसते. सांगोल्या सारख्या प्रादेशिक परिसरातील लोकजीवन, जीवनधारणा, लोकसंस्कृती, रूढी-परंपरा, त्यातील सुसंगती आणि विसंगती, शेतीभाती, समूहभावना, त्या विशिष्ट प्रदेशातला निसर्ग या सर्वांच्या साथीचे आणि साक्षीने निर्माण झालेले पेचप्रसंग, ताणतणाव व जीवननाट्य या सर्वांचे दर्शन भोसल्यांच्या कथांतून घडते.

प्रदेशोन्मुख होऊन आलेल्या या प्रादेशिक घटकांचा वेगवेगळा विचार पुढीलप्रमाणे करता येतो -

**भौगोलिकता आणि निसर्ग :-**

त्यांच्या कथेत भौगोलिकतेचा उल्लेख सामग्र्याने आला नसला तरी त्या प्रदेशाच्या भौगोलिक वैशिष्टयाला अनुसरून काही कथा येतात. उदा. "राज्यात दुष्काळ पडतो." आणि "केवळ प्रजेच्या सुखासाठी" या दुष्काळी जीवनावर प्रकाश टाकणा-या कथा, कळतनकळत त्या प्रदेशाचे प्रदेश वैशिष्टय सांगतात. आणि दुष्काळी जीवनमानाचे नि प्रादेशिक समस्यांचे दर्शन घडवतात. डॉ.मदन कुलकर्णी[5] म्हणतात त्याप्रमाणे प्रादेशिक कथेतील किंवा कादंबरीतील "कथावस्तूचे महत्त्वपूर्ण अंग म्हणजे प्रादेशिक जीवन समस्यांचे चित्रण करणे होय." अर्थातच भोसल्यांच्या कथेतील कथावस्तुत, या प्रादेशिक जीवन समस्यांचे चित्रण प्रकर्षाने आढळून येते.

किंबहुना, सांगोला परिसर हा माडगूळकरांच्या माणदेशाप्रमाणंच दुष्काळग्रस्त पार्श्वभूमी असलेला, दुष्काळग्रस्त प्रदेश आहे. पावसाचा लहरीपणा, अनिश्चितपणा किंवा अकालीच अतिरेक अगर अभाव यामुळे तेथे वरचेवर दुष्काळ पडतो. अर्थातच त्यांच्या कथांतून येणा-या लहरी निसर्गाचे आणि भौगोलिक वातावरणाचे चित्रण समर्पक वाटते. भौगोलिक व सार्वत्रिक निसर्गाप्रमाणेच - "निसर्ग" हा स्वतंत्र आणि "आत्मसाक्षात्कारी"[6] घटक म्हणूनही त्यांच्या कथेत आलेला दिसतो. किंबहुना हा आत्म-साक्षात्कारी आणि आत्मस्पर्शी निसर्ग त्यांच्या कथांतून अधिक्याने येतो. आणि पात्रांच्या वृत्ती-प्रवृत्तीशी नाते जोडताना दिसतो. त्यामुळेच हा निसर्ग डॉ.प्रल्हाद वडेर[7] यांना अभिप्रेत असलेल्या निसर्गासारखाच आहे, असे म्हणावे लागते. उदा. "अगं अगं म्हशी" या कथासंग्रहातील "कथा अंत्यसंस्काराची" ही कथा. पावसाळी पार्श्वभूमीमुळे आशयाला अधिक उठाव देऊन जाते. तसेच "पाऊस" या कथासंग्रहातील "बाजार" या कथेत आत्मस्पर्शी निसर्गस्थितीचे चित्रण आले आहे. हे चित्रण असे की, "अंधार वाढत चालला. झाड अगदी दिसेनासे झाले.सावल्या मिळून गेल्या. पक्षी शांत झाले. पण वटवाघुळांची फडफड थांबली नाही. झाडाचा बुंधा वाळवीनं पोखरलेला.

सापांची बिळं, त्यात वेटोळे करून बसलेला तो साप · ···· तोंडात पकडलेली बेडकी· तिचा तो आर्त स्वर·साप बेडकीचा हा खेळ कधी संपणार आहे?" लेखकाचे हे तृतीयपुरुषी निवेदन शेतमालक देसायाच्या वासनेची बळी ठरलेल्या शेतमजूर चंपाच्या सद्यस्थितीशी जुळणारे आहे· तसेच "ढासळलेली भिंत" आणि "विनवणी" या कथांतील संध्याकाळच्या वेळेचं मरगळलेलं वातावरण हे त्या त्या पात्रांच्या मनस्थितीशी जुळताना दिसते·

"जन्म" या कथेतलं अवघडलेल्या पावसाळी ढगांचं वर्णन हे गेनाच्या गरोदरपणात अवघडलेल्या बायकोच्या स्थितीशी एकरूप झालं आहे· "जहाज" या कथेत आलेल्या नदीच्या चित्रणातून कथा नायिका जिजाई आणि नदी या दोघींच्या जीवनातील साम्य-भेदावर प्रकाश पाडला आहे· "भेट" या कथेतलं उद्दीपीत वातावरणाचं चित्रण हे त्या कथेतील स्वामींच्या उद्दीपीत होत जाणा-या भावनांशी तथा कामातुरतेशी एकरूप झालेलं दिसते· तरीपण पृष्ठ 111 वर आलेल्या कुत्र्याच्या चित्रणाशी त्यांची तुलना होताना दिसते· त्याचप्रमाणे "सुटका" आणि "जन्म" या दोन्ही कथांतून आलेलं "कोंदट पावसाळी वातावरण" हे त्या सालगडयाच्या कोंदट जीवनाशी नातं जोडणारं आहे·

अशाप्रकारे त्यांच्या कथेतील निसर्ग हा त्या कलाकृतीच्या रूपाशी आणि घाटाशी एकरूप झालेला दिसतो·

**संस्कृती :-**

"विशिष्ट प्रदेशातील सांस्कृतिक वातावरणातून प्रादेशिक साहित्याची निर्मिती होत असते·" असे प्रा·स·शि·भावे[6] यांचे प्रातिनिधीक मत आहे· म्हणूनच प्रदेश संस्कृतीला प्रादेशिक साहित्यात महत्त्व आलेले दिसते·

भोसल्यांच्या कथांतूनही सांगोला परिसरातील संस्कृती सामर्थ्याने प्रकट झाली आहे· या संस्कृतीतील चालीरीती, लोकसंकेत, लोकरूढी, परंपरा, देवधर्म, श्रध्दा, अंधश्रध्दा इत्यादी बाबींचे दर्शन त्यांच्या कथातून घडते· उदा· "प्रौढशिक्षण"

या कथेत वासनांध, व्यभिचारी तथा जारकर्म करणा-या कोलाटणीचा उल्लेख येतो· "कथा अंत्यसंस्काराची" या कथेत अंत्यसंस्काराच्या प्रथेचे दर्शन घडते· "येशा" या कथेत अनैतिक संबंध असणारांचा तसेच धार्मिक कार्यासाठी देवाला बकरे कापण्याचा उल्लेख येतो· "बाबूराव न्हावी" या कथेत अनैतिक संबंधाचा आणि ठेवलेल्या बाईचा उल्लेख येतो· "वरात" या कथेत लग्नानंतर वरात काढण्याची प्रथा दिसून येते· तर "पाऊस" या कथेतली भागू संकटसमयी दैववादी बनते; - "देवा परमीसरा, माज्या लेकराला वाचीव· माज्या नाचाराला त्योच तेवढा आधार हाय····· माझ्या म्हातारपणीची काठी हाय ती· हात जोडते तुला देवा· माज्या गणाला बरा कर· उपकार इसरणार न्हाय मी तुजं·" यातून तिची आदिमता आणि धर्मभोळेपणाच दिसून येतो· "देवपूजा" या कथेत श्रीधरपंतांच्या मुलांची मुंज धुमधडाक्यात झाली असल्याचा संक्षेपाने उल्लेख येतो· "निवडणूक" या कथेत महारांनी महारांच्या पायरीनंच रहावं असा सामाजिक संकेत येतो· "भेट" या कथेत परस्त्रीकडं आसक्त वृत्तीनं पाहणं हे पशुवत असल्याचा संकेत येतो· "सुटका" या कथेत कुत्र्याचं रडणं हे अशुभ असल्याचा संकेत येतो· "जहाज" व "निर्णय" या कथांतले ग्रहस्थी पुरुष देवधर्माच्या नादाला लागून बुवा बनलेले दिसतात· शिवाय "जहाज" या कथेतंच साधूपणा करताना, शारीरीक सुखाची अपेक्षा करण्यात पाप असल्याचा उल्लेख येतो· "कोसळलेली" या कथेत देवाची चोरी करणं हे पाप असून, त्यातून कोप होण्याची भीती प्रतित होताना दिसते· तर "वाढदिवस" या कथेतल्या भागू म्हारणीच्या पोराला, अंधारातून जाताना भूताची भिती वाटते, यासारख्या अंधश्रध्देचे दर्शन घडतें·

अशाप्रकारे त्यांच्या कथांतून काही संस्कृती विशेषांचे दर्शन घडते· "प्रादेशिक म्हणवल्या जाणा-या साहित्यातील संस्कृती आपल्या स्वतःच्या परिस्थितीच्या परिणामातून जन्माला येत असल्याने कृत्रिमतेचा दोष तिला लागत नाही·"[9] या दृष्टीने पाहता भोसल्यांच्या कथांतील संस्कृती ही त्या प्रदेशाची स्वतःची अशी आणि अकृत्रिम संस्कृती आहे· तरीसुध्दा त्या संस्कृतीचे प्रदेशविशिष्ट वेगळेपण प्रकर्षानं जाणवत नाही· ते वेगळेपण न जाणवण्यामागचं मुख्य कारण हेच की, त्या संस्कृतीत सापडणारे प्रमाणभूत

संस्कृतीविशेष एकच आहेत. म्हणजे सांगली, सातारा, सोलापूर आणि कोल्हापूर या प्रदेशातील संस्कृतीविशेषात भेदांपेक्षा साम्यच अधिक आहे. इतकेच काय पण मराठेप्रणीत "महाराष्ट्र संस्कृतीत" भेदांपेक्षा साम्यच अधिक। परंतु एवढयावरून, सा-या प्रदेश संस्कृती एकच ठरतात असे मात्र नाही. किंबहूना साम्यापेक्षा भेद हे थोडे असले तरी ते भेदही महत्त्वपूर्ण असतात. जसे की मागे उल्लेख केल्याप्रमाणे कोल्हापूर-सातारा व सोलापूर या प्रदेशातील संस्कृतीत बरेच साम्य असूनही, "लग्न प्रथेबाबत मात्र भिन्नता आढळते. म्हणजे कोल्हापूर परिसरात भाची व मामा यांचे लग्न होऊ शकते. पण सातारा-सोलापूर परिसरात मामाला भाची देणे ही प्रथा वर्ज्य आहे. असे भेद क्वचितच सापडतात ही गोष्ट वेगळी. तरीसुध्दा परस्पर भिन्न प्रदेशातील महत्त्वाचा भेद म्हणजे - तेथील राहणीमान, जीवनमान आणि बोलीभाषा. अर्थातच भोसल्यांच्या सांगोला परिसरातील लोकांचे राहणीमान, जीवनमान आणि बोलीभाषा यामुळे त्यांची संस्कृती भिन्न ठरते. बोलीभाषा हा संस्कृतीतला महत्त्वाचा विशेष ठरतो. अन् भोसल्यांच्या कथेतील बोलीभाषा ही इतर प्रदेशाहून भिन्न आहेच.

तात्पर्य, भोसल्यांच्या कथांतून आलेल्या संस्कृतीत सापडणारे अल्प भेद आणि अधिक साम्य यामुळे तिच्यातील वेगळीक प्रकर्षानं जाणवत नाही इतकेच. म्हणूनच त्यांच्या कथेतील प्रादेशिकता ही व्यापक परिणाम साधते. आणि असं असूनही ती स्वतःचं स्वत्त्व गमावत नाही. कारण भोसल्यांच्या सांगोला परिसरातील संस्कृती ही इतर प्रदेशाहून भिन्नच ठरते. ती यामुळेच की, तिथली संस्कृती ही अधिक्यानं आदिमतेकडं झुकलेली दिसते. तथापी माणसातलं माणूसपण शोधण्याऐवजी, दगडातलं देवपण शोधण्याचा तिथली संस्कृती प्रयत्न करते. किंबहूना या दुष्काळी मातीत जगणा-या माणसांना माणूसपण मिळत नाही म्हणूनच ते दैववादी बनतात. न पावणा-या निसर्गावर आणि न पावणा-या दैवावर विश्वास ठेवणारी ही माणसे स्वतःच्याच दैवाला शिव्या देतात - देवाला नव्हे। संकटकाळी साथ देणारा, परमेश्वराइतका समर्थ दुसरा कुणीच नाही अशीच त्यांची धारणा. आणि त्याला पोषकच वातावरण, यातूनच ते दैववादी बनलेले दिसतात. म्हणून त्यांची संस्कृतीही

आदिमतेकडं झुकलेली दिसते आणि यांनच या संस्कृतीचं वेगळेपण सापडतं.

**सामुहिक जीवन :-**

भोसल्यांच्या कथांतून सामुहिक जीवनाचे दर्शन प्रकर्षाने घडते. या कथांतून केवळ एखादेच पात्र येत नाही तर अनेक पात्रे येतात. त्यांची कथा ही अमूक एका पात्राचीच कथा आहे असे वाटत नाही. त्यांच्या प्रत्येक कथेत एकापेक्षा अधिक पात्रे येतात. त्यांची एकही कथा अशी नाही की, ती एकपात्रीय किंवा व्यक्तिकेंद्रीत आहे. त्यांच्या कथेतील पात्रे ही त्या प्रदेशातील समुहजीवनाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. या कथांतून शेतमजूर सालगडी, शेतमालक, दरिद्रयपीडीत श्रीमंत अशी वेगवेगळ्या स्तरातील पात्रे येतात. ही पात्रे त्या-त्या वर्गाचे (स्तराचे) प्रतिनिधीत्व करताना दिसतात. सुष्ट आणि दुष्ट, स्वार्थी-निस्वार्थी, नैतिक-अनैतिक, साधी-इरसाल अशी अनेक प्रवृत्तीची पात्रे त्या-त्या प्रवृत्तीच्या समूहजीवनाचे प्रतिनिधित्व करतात. त्यांच्या कथेत त्या प्रदेशजीवनातील विविध जीवनांगाचे दर्शन घडविण्यासाठी या पात्रांचे साहय झालेले दिसते. त्यांच्या कथेत एखादेच पात्र प्रमुख आहे असे वाटत नाही. तर सर्व पात्रेच आपापल्या परीने स्वयंसिध्द ठरतात. उदा. "पाऊस" या कथेतली भागू हीच नायिका आहे असं नव्हे तर त्या कथेतला पाऊसही एक प्रभावी पात्र ठरतो. भागूच्या व्यक्तिचित्रणाइतकेच पावसालाही त्या कथेत महत्त्व आले आहे. हेच चित्र त्यांच्या प्रत्येक कथांतून दिसून येते. अर्थातच, त्यांच्या कथा व्यक्तिकेंद्रित ठरत नाहीत तर त्या समूहकेंद्रित ठरतात. तरीसुध्दा द.ता.भोसले म्हणतात त्याप्रमाणे "सामुहिक मनाच्या समान आचार विचारासाठी लेखकाला सामाजिकतेचा आधार घ्यावा लागतो."10हे सुध्दा खरे आहे. म्हणूनच त्यांच्या कथेतील सामाजिकतेचा पुढीलप्रमाणे विचार करू.

**सामाजिकता :-**

केवळ स्वप्नरंजनाच्या हव्यासापायी सोज्वळ समाजाचं दर्शन घडवणं आणि सामाजिकतेत अंतर्भूत असलेल्या चांगल्या गोष्टींचंच चित्रण करणं तसेच तीमधील वाईट गोष्टींकडं दुर्लक्ष करणं हा भोसल्यांच्या कथालेखनाचा हेतू नाही. समाजातील चांगल्या गोष्टींची उजळणी करत बसण्यापेक्षा, समाजातील वाईट बाजू उजेडात आणणे,

उपेक्षित जीवनावर प्रकाश टाकणे हाच भोसल्यांच्या कथालेखनामागील मूळ हेतू आहे· म्हणूनच ज्यांच्यातलं माणूसपण नाकारलं आहे अशाच दीन, दलित, पतित आणि उपेक्षीत लोकांचं दर्शन घडवण्यावर त्यांचा अधिक भर दिसतो· समाजात जे चांगले असेल ते असावेच पण वाईट असेल तेही बदलावे अशी त्यांची तळमळ दिसते· म्हणूनच त्यांनी समाजातील वाईटाचे उच्चाटन काही नाही पण विडंबन मात्र केले आहे· त्यांच्या कथांतून जी सामाजिकता आली आहे ती सामाजिकता अगदीच काळवंडलेली दिसते· ही सामाजिकता माणसातल्या माणूसपणाचा खून करणारी ठरते· तथापी ही सामाजिकता अमानुष आहे· सामान्य माणसातलं माणूसपण तिला शोधता येत नाही तथा ते शोधण्याचा तिला सोस नाही· कारण, ही सामाजिकता स्वतः आत्मवंचित आहे· म्हणूनच ज्यांच्यातलं माणूसपण या सामाजिकतेनं नाकारलंय, ते लोकसुध्दा या सामाजिकतेला दोष देताना दिसत नाहीत· तर ते दोष देतात आपल्याच नशीबाला·

भोसल्यांच्या बहुतांश कथा या सामान्य शेतकरी, दरिद्रयपीडीत शेतमजूर, सालगडी, कष्टकरी, हातावर पोट भरणारे दलित, पीडीत असे स्त्रीया आणि पुरूष यांच्याच जीवनाभोवती फिरतात· या लोकांचं जीवन गांजलेलं आणि कंगाल असं आहे· मान, प्रतिष्ठा, माणूसपण या गोष्टी त्यांच्या वाटयाला येत नाहीत· मान-पान नाही पण, साधे माणूसपणही नाकारल्याची त्यांना खंत आहे· माना-पानाचे त्यांना सोयर-सुतक नाही· याहीपेक्षा दोन वेळेचं अन्न मिळवणं हीच त्यांची धडपड आहे· पण त्यातही अनेक विघ्ने येतात· म्हणूनच दोन घास मिळवून जीवन जगवणं हेच त्यांच्या पुढचं सर्वात मोठं आव्हान आहे। जनावरांचं बळ घेऊन त्याना हे जगण्याचं आव्हान पेलावं लागतं· या आव्हानाच्या आघातानंच त्यांच्यातलं मानी पण खालाऊ लागलं· म्हणून त्यांचं मानीपण पुसट होत गेलं· आणि समाजानंही त्यांच्यातलं माणूसपण नाकारलं· असं असून सुध्दा ते स्वतःतलं माणूसपण जपण्याचा आटोकाट प्रयत्न करतात· कारण, त्यानाही माणूस म्हणून जगण्याची तीव्र इच्छा आहे· पण समाज त्यांना माणूस म्हणून जगू देत नाही· परंतु याचा दोष ते समाजाला देत नाहीत· तर ते दोष देतात - आपल्याच दैवाला आणि परिस्थितीला· त्याना

आपल्यावर होणा-या अन्यायाची जाणीव होऊन देखील ते त्या विरुध्द बंड करु शकत नाहीत, याला एकमेव कारण त्यांची परिस्थिती। किंबहूना माणसातलं माणूसपण कुठं हरवलंय याचा भोसल्यांच्या कथांतून शोध घेता येतो·

माणूस म्हणून जगण्याच्या तीव्र इच्छेमुळंच भोसल्यांच्या कथेंतील पात्रांची नैतिक घसरण झालेली दिसत नाही· त्यांच्या सर्वस्वावर डाका घातला जातो· तरीही ती नैतिकदृष्टया खालच्या हीन पातळीवर जात नाहीत· या कथांतील स्त्रीपात्रांना दोन वेळेचं अन्न मिळवण्याची मारामार असूनही ती नीतिमत्तेचा, तारूण्याचा आणि चारित्र्याचा विक्रय करु इच्छित नाहीत· वासना मारुन जगणारी ही पात्रं, वासनातृप्ती साठी स्वैर होताना दिसत नाहीत· माणूस म्हणून जगण्याच्या धडपडीतूनच ती कुठल्याही अमिषाला भूलत नाहीत· अगाध कष्ट अन नीतिमत्ता या पात्रांच्या रक्तात मुरुन गेलेली दिसते· यादृष्टीने - "राज्यात दुष्काळ पडतां", "दुःख", "येशा", "पाऊस", "बाजार", "जन्म", "झुंज", "सुटका", "निर्णय", "ऊन", "वाढदिवस" "मागणी" इत्यादी कथा विलक्षण ठरतात· ही सामाजिकता काळवंडण्याचे एकमेव कारण म्हणजे - शेतमालकांचा सालगडयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन, श्रीमंतांचा गरीबांकडे पाहण्याचा दृष्टीकोन, वासनाअंधांचा व परपुरुषांचा परस्त्रीयांकडं पाहण्याचा दृष्टीकोन आणि उच्चवर्णियांचा दलितांकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा मूलतः नीच आहे·

भोसल्यांच्या जवळजवळ सर्व कथांतून तेथील सामाजिकता प्रतित झाली आहे· म्हणूनच एका अर्थानं त्यांच्या बहुतांश कथा या सामाजिक कथाच आहेत· सामाजिक जीवनदर्शन हेच त्यांच्या कथांचे प्रमुख वैशिष्टय दिसते· त्यांची लेखणी प्रेमाच्या गुलाबी गुलकंदाच्या स्वप्नाळू जगात रमण्याऐवजी, सामाजिकतेच्या जगातील विदारक कटू सत्याचं दाहक दर्शन घडवतात·

**जीवननाट्य आणि समस्या :-**

भोसल्यांच्या कथांतून आलेल्या प्रदेश समस्यांचे स्वरुप व्यापक असे आहे· म्हणजेच प्रादेशिक सामाजिक, राजकीय, धार्मिक अशा अनेकविध प्रकारचे या समस्यांचे स्वरुप आहे· या समस्या कधी प्राकृतिक तर कधी मानवी स्वरुपात अवतीर्ण झालेल्या

आहेत· मुख्यतः या समस्या अधिकतर सामाजिक आहेत· या सामाजिक समस्या दोन प्रकारच्या स्थितीगतीशी नाते जोडताना दिसतात· एक म्हणजे "गतीशील समाज जीवनाशी" आणि दुसरे म्हणजे "स्थितीशील तथा पारंपारिक समाज जीवनाशी· या दोन्ही समाजजीवनाची अधिक स्पष्टता येण्यासाठी "निवडणूक" या कथेचे उदाहरण घेऊ· "निवडणूक" या कथेतला चांगा महार, स्वतःच्या खालच्या पायरीनं राहण्यात धन्यता मानतो· म्हणजे गरिबानं गरीबासारखं रहावं असं तथा महारानं महारासारखं रहावं असं। त्याचं हे तत्त्वज्ञान त्या प्रदेशापूरतं खरंही ठरतं· पण वैश्विक पातळीवर ‡गतीशील पातळीवर‡ त्याचं हे तत्त्वज्ञान त्याच्या माणूसपणाला मर्यादा घालतं· म्हणूनच त्याच्यावर जे घोर अन्याय होतात त्याविरूध्द आवाज उठवायला त्याचं हे स्थितीशील तत्त्वज्ञान आड येतं· तात्पर्य - महारानं महाराच्या पायरीनं राहवं किंवा महारांची पायरी खालची आहे, हे झालं स्थितीशील ‡पारंपारिक‡ समाज जीवनाचं चित्रण· तर -"प्रत्येकालाच अन्यायाविरूध्द आवाज उठवायचा अधिकार आहे· प्रत्येकालाच माणूस म्हणून जगता आलं पाहिजे, वागता आलं पाहिजे आणि इतरांनाही तसंच वागवलं पाहिजे· माणसातलं माणूसपण मान्य करताना त्याचा आर्थिक स्तर तथा जातीय स्तर आड येता कामा नये·" हे झालं गतिशील समाजाचं चित्रण· या कथेत लोकशाही माध्यमातून आलेलं हे गतीशील समाजाचं चित्रण, चांगाला बंड करण्याची सूचना देऊन जातं· तरीसुध्दा चांगाला बंड करता येत नाही· याला एकमेव कारण म्हणजे त्याची परिस्थिती· आणि यापेक्षाही तेथील प्रादेशिक परिस्थिती· कारण विशिष्ट स्थितीशील समाज जीवनाचा पगडा असलेल्या त्या प्रदेशाला आणि चांगालाही ते बंड मानवलं नसतं हेच खरं· यादृष्टीने प्रादेशिक समस्यांच्या स्वरूपांची गुंतागुंत सोडवण्यासाठी तेथील स्थितीशील व गतिशील अशी दोन्ही चित्रणे महत्त्वाची ठरतात· अर्थातच भोसल्यांच्या कथांतून या दोन्ही प्रकारची चित्रणं आल्यामुळे, त्यांच्या प्रदेशपुरस्सर सामाजिक समस्यांचे अनेकांगीत्त्व दिसून येते·

**बोलीभाषा :-**

भोसल्यांच्या कथांतून सांगोला परिसरातील बोलीचा संवाद रूपाने वापर केलेला आढळतो. परन्ही गरजेनुसार प्रमाण भाषेतील निवेदनही आले आहे. एन्हाना त्यांच्या बोलीतील शब्द, म्हणी, वाक्प्रचार, उच्चारपध्दती इत्यादींमधून त्यांच्या बोलीचे वेगळे स्वरूप स्पष्ट होते. ही सांगोला परिसरातील बोली तिथल्या प्रदेश वैशिष्टयांसह त्यांच्या कथेत आल्यामुळे वातावरण निर्मितीस साह्य् झाले आहे. या बोलीत तिथल्या समाजाचे बरेच गुणविशेष आढळतात. त्यामुळे स्वाभाविकतेचे अंग अधिकाधिक चैतन्यमय होताना दिसते. त्यांच्या कथेतील बोलीमध्ये - काय गा (काय रे), अालतू-गेलतू (आलो होतो - गेलो होतो), वंगाळ (वाईट), इगत (युक्ती), दांडगं (मोठं), मायंदाळ (पुष्कळ), आल्ता-गेल्ता (आला होता - गेला होता), दी (दे), जरूकसं (जरासं), पास्न (पासून), पातुर (पर्यंत), हाय-न्हाय (आहे-नाही), हाकडं-तकडं (इकडे - तिकडे), नै (नये)द कवाशीक (केव्हाच), म्हागं-फुडं (मागे-पुढे) इत्यादी प्रदेशविशिष्ट शब्द आले आहेत. तसेच कडमडणे (भुकेजणे), पेकाळणे (पांगळणे), इस्कोट होणे (विघ्न येणे), इस्वाटा घेणे (विश्रांती घेणे), फैलावर घेणे (खरडपट्टी काढणे), तरास देणे (त्रास देणे), कोकलणे (ओरड करणे) इत्यादी वाक्प्रयोग सापडतातं. त्याचप्रमाणे थू तुज्या आयला, भडव्या, मढं उच्चलूं मी, थु तुज्या भडवीच्या, मेल्यानू, मुडद्यानू यासारख्या शिव्या आणि त्या प्रदेशात विशेष लोकप्रिय असणारा शब्द म्हणजे - "आरं तिच्या मारी" हा शब्द होय. हा शब्द मुख्यतः "अरेच्च्या" या शब्दाला समांतर जाणारा असून, आश्चर्य व्यक्त करताना वापरला जाणारा हा शब्द, त्यांच्या बोलीत अनेक ठिकाणी येऊन जातो.

त्याचप्रमाणं त्यांच्या कथांतून काही प्रादेशिक ठिकाणांचा तथा प्रदेशविशिष्ट स्थळांचा उल्लेख आलेला दिसतो. उदा. डांगरवाडी (प्रौढशिक्षण), केदारवाडी(दुःख), पंढरपूर (बाबूराव न्हावी), ओझेवाडी (वरात), पंढरपूर (वरात), रांजणी (निवडणूक) कासेगांव-गादेगांव (विनवणी) इत्यादी गावांचे आणि वाडयांचे उल्लेख आले आहेत. यातूनच त्यांच्या कथाना प्रदेशविशिष्टता प्राप्त होताना दिसते.

अशाप्रकारे भोसल्यांच्या कथांतून प्रादेशिक घटक प्रदेशोन्मुख होऊन आल्याचे दिसून येते· त्यामुळे त्यांच्या कथा प्रादेशिक परिणाम साधतात, असेच दिसून येते आणि या परिणामातूनच त्यांच्या कथांना प्रादेशिक वेगळेपण लाभल्याचे प्रकर्षाने आढळून येते·

**प्रादेशिकतेमुळे द·ता·भोसले यांच्या कथासाहित्याला लाभणारे वेगळेपण :-**

"एखाद्या विशिष्ट भूभागाचे वास्तव व वेगळे चित्रण करण्यात येऊ लागल्यामुळे अशा चित्रणाच्या लिखाणाला "प्रादेशिक" हे नांव सर्रास रूढ झाले"[11] असे डॉ·भाऊ मांडवकर म्हणतात· अर्थातच कलाकृतीचे सर्व घटक प्रदेशोन्मुख होऊन येऊ लागले· प्रदेश जीवनावर लिहल्या गेलेल्या साहित्यात प्रादेशिक, शेतकी, दलित, उपेक्षीत जीवनावरील चित्रणे येऊ लागली· विशिष्ट प्रदेश तथा जाती-जमातींचे चित्रण करताना तेथील लोक, त्यांचे जीवन, भाषा, समजूती, रूढी, राहणी, दैवत, सणवार, उत्सव, जत्रा, प्रथा, परंपरा, श्रध्दा, अंधश्रध्दा इत्यादींचे महत्त्व कथाकाराला वाटू लागले· या दृष्टीनेच द·ता·भोसले यांच्या कथा साहित्यातूनही शेतकी, दलित, उपेक्षीत आणि मागास जातीजमातीतील लोकांचे प्रदेशनिहाय जीवनचित्रण आलेले आहे· ते इतर प्रदेशाच्या तुलनेत काही बाबतीत निश्चित भिन्न आहे, हे सुध्दा खरे आहे·

किंबहूना भोसल्यांच्या कथांतून आलेले सांगोला भूप्रदेशातील रीतिरीवाज, परंपरा आणि जीवनधारणा या इतर प्रदेशाच्या मानाने निश्चित भिन्न आहेत· या प्रदेशातील लोकांचे आचारविचार, राहणीमान, सामाजिकता, रीतीभाती, सामाजिक संकेत, धार्मिक संकेत, प्रावर्ण मानसिकता आणि महत्त्वाचे म्हणजे बोलीभाषा; हे काही बाबतीत भिन्न आहेत· म्हणूनच त्यांनी प्रादेशिकतेचा आविष्कार करताना त्या समाजव्यवस्थेतीलच साहित्यानुभव व्यक्त केला आहे. या साहित्यानुभवाशी निगडीत असलेले सांस्कृतिक व सामाजिक संदर्भ त्यांच्या कथांतून आले आहेत· सामाजिक विशिष्टतेतून जन्माला आलेल्या सामाजिक आचारांना जे भिन्नत्व आले आहे, त्या भिन्नत्त्वासह ते त्यांच्या कथांतून आले आहे· म्हणूनच त्यांच्या कथासाहित्याला भिन्न

सामाजिक विशिष्टतेतून, पर्यायाने प्रादेशिक विशिष्टतेतून भिन्नत्व प्राप्त झाले आहे, हेच खरे· अर्थातच त्यांनी आपल्या कथांतून भिन्न साहित्यानुभवाबरोबरच त्या प्रदेशाची वेगळी जाण - या दोहोंत कलात्मक समवाय ठेवल्यामुळे त्यांच्या कथावाङ्मयाला विशिष्ट मर्यादेपर्यंत वेगळेपणा लाभतो, हे नाकारता येत नाही·

## द·ता·भोसले यांच्या कथासाहित्यातील गुण-दोष चर्चा :-

"अगं अगं म्हशी" हा त्यांचा ग्रामीण विनोदी कथासंग्रह असून यातील कथा या मुख्यतः प्रादेशिक ठरतात· परंतु त्यांच्या या प्रादेशिक कथांतील विनोदाचं स्वरूप पहात असताना काही ठिकाणी त्यांच्या विनोदी कथांना अस्वाभाविकतेचे गालबोट लागलेले दिसते· काही ठिकाणी त्यांनी केवळ विनोदनिर्मितीसाठी अवास्तव खटाटोप केल्याचे आढळते· असंभाव्य प्रसंगावर भर देऊन विनोदनिर्मितो करण्याची ओढाताण केलेली आढळते· यावेळी विनोदासाठी विनोद एवढीच भूमिका दिसते· उदा· "दुःख" या कथेतील इसनूच्या प्रेताभोवती जमलेल्या आजूबाजूच्या स्त्रियांची अवास्तव वाटणारी विवेकशून्य वर्तणुक, "कथा अंत्यसंस्काराची" मधील प्रेताचे गुडघे मोडण्याचा प्रसंग, "लढत" या कथेतील पाहुण्या दांपत्यांचा असंभाव्य निर्लज्जपणा आणि त्यांच्यातील हाणामारीचा प्रसंग इत्यादी चित्रण अवास्तव वाटते· त्यातूनच अतिशयोक्ती, असंभाव्यता आणि अतिरंजितता इत्यादी दोष त्यांच्या विनोदी कथेला लागतात· तरीपण हे दोष असूनही त्यांची कुठलीही कथा संपूर्णपणे निकृष्ठ ठरू शकत नाही· कारण एखादं दुसरा असंभाव्य, अवास्तव प्रसंग वगळता त्यांची कथा अधिक गुणवान वाटते· तथापि त्यांच्या कथांतून विनोदी घटना प्रसंगांची गर्दी झाल्यामुळे, किंबहुना त्यांनी तशी गर्दी करण्याचा खटाटोप केल्यामुळे ती दोषाकडे झुकताना दिसते· अन्यथा हे क्षुल्लक अपवाद सोडून दिल्यास, वगळल्यास त्यांचा विनोद प्रौढ, परिपक्व, श्रेष्ठ आणि स्वाभाविक वाटतो· अभिजात मिस्कीलता हा त्यांच्या विनोदाचा महत्त्वाचा गुणविशेष ठरतो·

त्याचप्रमाणं "अगं अगं म्हशी" या कथासंग्रहातील "ऑफ पिरियड", "झोप" आणि "लढत" या तीन कथा या पांढरपेशी जीवनाभोवती फिरताना दिसतात·

मात्र पांढरपेशी जीवनावर आधारीत चित्रणाचा प्रादेशिक साहित्यात अंतर्भाव होत नाही· या मताला अनुलक्षून वरवर पाहता त्या कथा अप्रादेशिक वाटतात· अर्थात पांढरपेशी जीवनावर कोणत्याच प्रादेशिक घटकाचा प्रभाव जाणवत नाही, त्यामुळे ते प्रादेशिक ठरत नाही, असे जरी असले तरी "ऑफ पिरियड" या कथेतील कथापात्रे ही प्रादेशिक आहेत· म्हणजे बोडके सर हे जरी पांढरपेशी पात्र असले तरी त्या कथेतील विद्यार्थी ही पात्रे सांगोला परिसरातील परिभाषा बोलतात· त्यामुळे ही कथा अप्रादेशिक ठरत नाही तर ती प्रादेशिकच ठरते· तसेच "लढत" या कथेतील इतर पात्रे ही पांढरपेशी चित्रणास्थीत वाटली तरी, त्यातील लेखक हे महत्त्वाचे पात्र प्रादेशिक आहे· सांगोला परिसरातील प्रादेशिक संस्काराने या पात्रांचे व्यक्तिमत्त्व घडलेले आहे· त्यामुळे लढत ही कथाही अप्रादेशिक न ठरता प्रादेशिकच ठरते· किंबहूना या कथाही प्रादेशिक असल्याचं प्रकर्षानं जाणवलं असतं, परंतु व्यापक पातळीवरचा आविष्कार साधण्याच्या ओघात त्यांतील प्रादेशिकता पुसट झाली आहे इतकेच· परंतु "झोप" या कथेतला कथानुभव हा प्रादेशिक असण्याची शक्यता असूनही तो प्रादेशिक आहे असे म्हणण्यास कोणताही वाव नाही· कारण प्रादेशिकतेचा कोणताही घटक या कथानुभवाने प्रदेशोन्मुख केल्याचे आढळून येत नाही· म्हणजेच त्या कथेवर कोणत्याही प्रदेश घटकाचा प्रभाव जाणवत नाही· त्यामुळे "अगं अगं म्हशी" या कथासंग्रहातील पंधरा कथांपैकी "झोप" ही एकच कथा अप्रादेशिक ठरते·

एकूण काय की, - लेखक ज्या प्रदेशात वावरतो, त्या प्रदेशानेच त्याला सारे साहित्यानुभव पुरवलेले असतात· त्याच्या अनुभवाला जीवनरस पुरवण्याचे कार्य हे त्या प्रदेशानेच केलेले असते· त्या प्रदेशातील पात्रांच्या जीवनात घडलेले प्रसंगच त्याने शब्दबध्द केलेले असतात· म्हणजे त्याचे सर्वानुभव हे प्रादेशिकच असतात असे जरी असले तरी ते शब्दबध्द करताना मात्र, त्यांवर प्रादेशिकतेचा प्रभाव जाणवला नाही तर ते प्रादेशिक आहेत असे वाटत नाही· याहीपेक्षा लेखकाच्या अनुभवातला जीवनरस हा त्या प्रदेशानेच पुरवला असेल असेही म्हणता येत नाही· तर तो

प्रदेशबाह्य जीवनानेही पुरवलेला असू शकतो· म्हणूनच त्याचे अनुभव हे तद्प्रादेशिकच असतात असेही नाही· तरीसुध्दा, त्याचा अनुभव हा कुठलाही असो· परंतु तो अनुभव जेव्हा विशिष्ट प्रादेशिकतेचा आविष्कार घडवील तेव्हाच त्या अनुभवाला त्या प्रादेशिकतेचा स्पर्श प्राप्त होत असतो· म्हणूनच त्याच्या अनुभवाला जोपर्यंत प्रादेशिकतेचा स्पर्श जाणवत नाही, तोपर्यंत ते अनुभव प्रादेशिक असोत की प्रदेशबाह्य असोत, ते अनुभव प्रादेशिक ठरत नाहीत· तर ते अप्रादेशिकच ठरतात, हेही खरेच· म्हणूनच त्यांची "झोप" ही कथा प्रादेशिक ठरत नाही·

तसेच "पाऊस" या कथासंग्रहातील "पाऊस" आणि "बाजार" या दोन कथा झोपडपट्टी जीवनाभोवती फिरताना दिसतात· परंतु झोपडपट्टी जीवनाचा समावेश प्रादेशिक साहित्यात होत नाही, असे प्रमाणित मत आहे· कारण झोपडवाशीय जीवन हे नगराशी संलग्न असते· त्यामुळे त्यांची संस्कृती ही नागर संस्कृतीच्या मिश्रणाने गढूळ झालेली असते· तथापी झोपडवाशीय संस्कृती ही प्रदेश संस्कृतीहून भिन्न तशीच कृत्रिमही असते· म्हणूनच झोपडवाशीय चित्रणाला प्रादेशिक साहित्यात स्थान नाही, असे ग्राह्य धरले जाते· म्हणूनच झोपडपट्टी जीवनाभोवती फिरणा-या भोसल्यांच्या कथाही अप्रादेशिक आहेत काय? याचाही विचार करावा लागतो·

खरे तर भोसल्यांच्या "पाऊस" या कथेतली भागू ही नगराशी संलग्न असणा-या झोपडपट्टीतील वाटते· तरीपण तिची ग्रामीण तथा प्रादेशिक जाण आणि बोली ही सांगोला परिसरातील वाटते· तिच्यावर शहरी संस्कृतीचा कसलाच प्रभाव जाणवत नाही· किंबहुना - कुबटलेला, बुरसटलेला भाकरीचा तुकडा तिच्या पोरीला कुणीतरी भिक म्हणून वाढलेला असतो· तेव्हा ती म्हणते, "मेल्यांनी कसलं वाढलंय तरी? उकिरडयावर टाकाचयं ते पदरात घातलंय· जनावर तरी तोंडात धरंल का हा तुकडा?" यावरुन ती नागर संस्कृतीतील वाटत नाही· परंतु प्रसंगी निःसंकोच भीक मागविते आणि कापडदुकानदार मारवाडयाकडे कामाला जाते, यावरुन ती ग्रामीण वाटत नाही· तरीपण तिच्या श्रध्दा, संकेत हे सांगोला परिसरातीलच वाटतात· नुसती भिक मागणे एवढयावरुन ती नागर ठरत नाही· उलट ती नाईलाजानं

भिक मागते· तरीपण मारवाडयाकडे उसने पैसे मागण्यासाठी ती फुटपाथवरून गेल्याचा उल्लेख येतो· अर्थातच फुटपाथचा व ग्रामीण भागाचा काही एक संबंध नसतो· म्हणूनच भागू ही ग्रामीण वाटत नाही· मात्र एवढे अगदी खरे की, या कथेत अर्धे चित्रण नागर तथा अप्रादेशिक असले तरी, ही कथा पूर्णतः अप्रादेशिक ठरत नाही· तर ती अर्धप्रादेशिक ठरते, एवढे मात्र निश्चित·

तसेच "बाजार" या कथेतील चंपा झोपडीत राहणारी असली तरी, ती ज्या झोपडपट्टीत राहते ती झोपडपट्टी ग्रामीण प्रदेश जीवनाशी बांधली गेली आहे· तथापी सांगोला परिसरातील बरेच लोक हे झोपडवाशी जीवन जगतात· किंबहुना चंपाचे खोपट तथा झोपडी ही शहराशी संलग्न असणा-या झोपडपट्टीतील नाही· याहीपेक्षा चंपा ही नित्यानं शेतमजूरीचे काम करणारी स्त्री आहे· तशीच तिची बोली आणि आचारविचारही ग्रामीण आहेत·तथापी या कथेतील सर्वच पात्रे ग्रामीण आहेत, यावरून चंपा सुध्दा निश्चितपणे नागर वाटत नाही, तर ती ग्रामीण तथा प्रादेशिकच वाटते· म्हणूनच "बाजार" ही कथा सुध्दा अप्रादेशिक भासली तरी, ती अप्रादेशिक नव्हे, पूर्ण प्रादेशिक आहे·

लेखकाचा अनुभव हा कितीही काल्पनिक असो, पण तो विशिष्ट मर्यादेपर्यंत तरी प्रदेशोन्मुख व्हायला हवा· जरी तो प्रदेशविन्मुख असला तरी प्रदेशबाहय न व्हावा· अगर, तो प्रदेशअंतर्गत असूनही प्रदेशबाहय न व्हावा· अशी प्रादेशिक साहित्याची अपेक्षा असते· परंतु ही अपेक्षा भोसल्यांच्या काही कथांना पूर्ण करता आली नाही· याचे उदाहरण म्हणजे त्यांची "झुंज" आणि "अनावर" या कथा· अर्थातच या कथांवर प्रादेशिक घटकांचा म्हणावा तितका प्रभाव जाणवत नाही· विशेषतः "अनावर" ही कथा विशिष्ट अर्थानं प्रदेशबाहय ठरते· तर "झुंज" ही कथा प्रदेशबाहय न ठरताही अप्रादेशिक ठरते· वास्तविक या कथा प्रदेशोन्मुख वाटत नाहीत· हा त्या कथांतील दोष आहे असे म्हणता येत नाही· कारण या कथांचा प्रधान हेतू हा अनुभवाची सिध्दता हाच असून तो हेतू चांगल्याप्रकारे साधला गेला आहे· किंबहूना अनुभवाची सिध्दता हाच कोणत्याही कलाकृतीचा प्रधान हेतू असतो·

म्हणूनच साहित्यातील प्रादेशिकता ही दुय्यम तथा गौण ठरते. थोडक्यात प्रल्हाद वडेरांच्या भाषेतंच सांगावयाचे झाल्यास, "शेवटी कलावंताला शोधायचा असतो, तो माणसातला माणूस."[12] हे सुध्दा खरे आहे. म्हणूनच त्या प्रादेशिक आहेत की नाहीत? एवढयावरून त्या दोषयुक्त ठरत नाहीत.

किंबहूना "झुंज" या कथेत आलेलं चित्रण हे शहरी तथा नागरी चित्रण वाटतं. कोणताही प्रादेशिक घटक किंवा तीमधील बोलीसुध्दा प्रादेशिक वाटत नाही. म्हणूनच "झुंज" ही कथा पूर्णतः अप्रादेशिक ठरते.

"अनावर" या कथेतील चित्रणसुध्दा सांगोला परिसरातील प्रादेशिक चित्रण आहे असं म्हणता येत नाही. कारण या कथेत जरंडेश्वराच्या डोंगराचा उल्लेख आला आहे. या कथेतील कथानायक "धर्मा" हा पुनर्वसीत आहे. त्याचं पुनर्वसीत गांव हे, जरंडेश्वराच्या आसपास असणा-या माळावर वसल्याचा उल्लेख येतो. म्हणजेच जरंडेश्वर हा डोंगर सातारा शहराच्या पूर्वेस तीन किलोमीटर अंतरावर असून, त्याच्या आसपासच्या माळावर वसलेले पुनर्वसीत गांव म्हणजे सातारा तालुक्यातील वाढे गावा नजीकचे "वासोळे" हे गांव. तथा वडूथ गांवानजीकचे "आसनगांव" हे गांव, भोसल्यांच्या नजरेसमोर असावे असे दिसते. म्हणजेच या "धर्मा" चे पुनर्वसीत गांव हे "वासोळे" किंवा "आसनगांव" या दोहोंपैकी एक असावे असे वाटते. अर्थातच या कथेतील घटना मुलद्रव्य हे सातारा जिल्हयातील "धोम" तथा "कण्हेर" धरणाने पुरविलेले दिसते. याहीपेक्षा जरंडेश्वरासारख्या प्रदेशबाहय स्थलाचा या कथेत उल्लेख येतो, म्हणूनच ही कथा प्रदेशबाहय ठरते. परंतु समान तथा एक संस्कृती विशेषातून सांगोला - सोलापूर - सातारा हा प्रादेशिक परिसर एकच आहे, असे व्यापक अर्थाने ग्रहीत धरल्यास, "अनावर" ही कथा प्रादेशिक आहे असे म्हणण्यास काहीच हरकत नाही.

तात्पर्य - भोसल्यांच्या "अगं अगं म्हशी" या कथासंग्रहातील पंधरा कथांपैकी, "झोप" ही एकच कथा अप्रादेशिक ठरते. तर "पाऊस" या कथासंग्रहातील सतरा कथांपैकी, "झुंज" ही एकच कथा अप्रादेशिक ठरते.

अशाप्रकारे "झोप" आणि "झुंज" यांसारखा एखाद दुसरा अपवाद वगळता, भोसल्यांच्या जवळ-जवळ सर्वच कथा प्रादेशिक आहेत असे समजण्यास हरकत नाही· लेखकाच्या अनुभवाचा आकार आणि त्याचा आशय-विषय कितीही काल्पनिक असो, परंतू त्याने किमपीही प्रदेश घटकांचा आधार घेतला नाही तर ते चित्रण प्रादेशिक ठरणार नाही· परंतु प्रादेशिक साहित्याला अभिप्रेत असलेल्या प्रदेश घटकांचा शक्य तेवढा वापर केल्याचे दिसून आल्यास, ते चित्रण प्रादेशिक ठरण्यास प्रत्यवाय नसतो हेच खरे· भोसल्यांच्या प्रस्तुत दोन्ही कथासंग्रहातून प्रादेशिकतेत अंतर्भुत होणारे जवळजवळ सर्वच घटक प्रदेशोन्मुख होऊन आले आहेत· त्यांच्या कथालेखनामागील मुख्य जाण ही प्रामुख्याने "ग्रामीण जाण" असूनसुध्दा तीमध्ये प्रादेशिकतेचे गुणविशेष ठळकपणे प्रतित होताना दिसतात· त्यामुळे त्यां कथा ग्रामीण आहेत याअगोदरही त्या प्रादेशिक आहेत हेच अधिक नजरेत भरते·

डॉ·वासुदेव मुलाटे त्यांच्या कथाबाबत म्हणतात· त्याप्रमाणे, "द·ता·भोसले याना ग्रामव्यवस्थेचे आकलन मात्र नेमके आहे·"13 हे जरी खरे असले तरी एखाद्याच खेडयाची ग्रामव्यवस्था त्यांच्या नजरेसमोर होती असे नाही· तर भौगोलिक दृष्टया एका संपूर्ण अशा प्रदेशाची, सांगोला परिसरातील ग्रामसंस्कृती आणि प्रादेशिक लोकजीवन त्यांच्या नजरेसमोर होते· म्हणूनच या प्रदेश संस्कृतीचे आणि प्रदेश व्यवस्थेचे प्रतिनिधित्त्व करणारी अनेक खेडी, खोपटवाशीय तथा झोपडवाशीय जीवन, शेतीसंस्कृती, बोलीभाषा आणि एकूणच तेथील प्रादेशिक विशिष्टता- तेथील समस्यांसह त्यांच्या कथांतून चित्रित झालेली दिसते· तथापी, त्यांनी त्या प्रदेशातील प्रदेशव्यवस्थेचे आणि जीवनव्यवस्थेचे प्रतिनिधित्त्व करणारी विविध स्तरातील पात्रे आपल्या कथांतून चित्रित केलेली दिसतात·

ग्रामीण कथालेखक म्हणून ग्रामीण कथालेखनाच्या इतिहासात एक समर्थ ग्रामीण कथालेखक म्हणून अलीकडच्या पिढीत त्यांचे स्थान निश्चित झालेच आहे· त्यांच्या ग्रामीण कथालेखनाला प्रादेशिकतेचे पैलू प्राप्त झाल्यामुळे ग्रामीण आणि प्रादेशिक कथालेखन करणारे ते एक श्रेष्ठ साहित्यिक ठरू पहात आहेत, हे नाकारता येत नाही· कादंबरी, नाटक व समीक्षा लेखन यामानाने त्यांचे ग्रामीण तथा प्रादेशिक

कथालेखन विपुल आहे· या सर्व साहित्यिक व वाङ्मय पार्श्वभूमीवर "अगं अगं म्हशी" व "पाऊस" हे त्यांचे दोन कथासंग्रह ग्रामीण व प्रादेशिक कथासंग्रह म्हणून आगळे व वेगळे वाटतात, यात शंका नाही· भविष्यकाळात द·ता·भोसले यांची ग्रामीण व प्रादेशिक लेखन करण्याची झेप उंचावत जाईल व मराठी ग्रामीण कथेला प्रादेशिकतेचे सखोल पैलू प्राप्त होतील असा आशावाद वाटतो· डॉ·द·ता·भोसले यानी प्रादेशिक कथासाहित्याचे स्थान अधिक दृढ व निश्चित स्वरूपात प्रदर्शित करावे असे मला वाटते· व त्यात त्यांना यश येईल, असे त्यांच्या आजपर्यंतच्या वाङ्मयावरुन ठामपणाने म्हणता येईल, यात शंका नाही· प्रादेशिकतेच्या वेगळेपणामुळे त्यांच्या ग्रामीण साहित्याला उज्ज्वल भविष्यकाळ लाभेल असा मला आशावाद वाटतो·

**संदर्भ :-**


1· तुकाराम : तुकारामांचे निवडक अभंग, संपादक श्री·म·पिंगे व गजमल माळ, व्हीनस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती मे 1978, प्रास्ताविक पृ·7·

2· कुलकर्णी मदन : मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 16 जून 1984, पृ·115·

3· यादव आनंद : "उखडलेली झाडे" मधील "भोवळ" ही कथा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, 10 एप्रिल 1986, पृ·12·

4· कुलकर्णी मदन : मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप, श्री· मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 16 जून 1984, पृ·204·

5· तत्रैव, पृ·114

6· तत्रैव, पृ·18

7· वडेर प्रल्हाद : आशय आणि आविष्कार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च 1988, पृ·26·

8· भावे स·शि· : आनंद यादव यांच्या "ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव" या पुस्तकाची प्रस्तावना, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती मे 1981, पृ·3·

9· कुलकर्णी मदन : मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, 16 जून 1984, पृ·18·

10· भोसले द·ता· : ग्रामीण साहित्य : एक चिंतन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती 1988, पृ·48·

11· मांडवकर भाऊ : "गजरा", सेवा प्रकाशन, अमरावती, 1971, पृ·12·

12· वडेर प्रल्हाद : आशय आणि आविष्कार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती मार्च 1988, पृ·32·

13· मुलाटे वासुदेव : ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास, साहित्यसेवा प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी 1992, पृ·169·